मेहता मराठी
ग्रंथजगत

जून, २०२३
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष तेविसावे
अंक सहावा

# राष्ट्रीय शिक्षण धोरण, 2020 - चिकित्सा



प्रा.डॉ. भालबा विभुते

# पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत केली गेली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

## 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**२०,०००/-**



पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पत्त्यावर पाठवावे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जून २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक सहावा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

*— अनुक्रमणिका —*


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **एक एक पान घडताना...** | ८ |
| **पुरस्कार** | १६ |
| **उपक्रम** | १८ |
| **प्रकाशन** | २० |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| द प्रॉडिगल डॉटर | २२ |
| द डे ऑफ द जॅकल | ३६ |
| सापशिडी | ४६ |
| करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब | ५४ |
| **दिनविशेष** | ५९ |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

सं
पा
द
की
य

## राष्ट्रीय शिक्षण धोरण - एक आकलन

माणसाच्या जीवनात ‘शिक्षण’ हा मूलभूत घटक आहे. १९९० नंतर जागतिकीकरण झाल्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात स्पर्धा सुरू झाली. यामध्ये आपला देश इतर देशांच्या तुलनेत मागे पडू नये ही भूमिका होती. यासाठी धोरण असणे खूप महत्त्वाचे आहे. धोरणे बनवली तरी ती योग्य रीतीने राबवली गेली का? त्याचा कोणता परिणाम मग तो सकारात्मक असेल वा नकारात्मक असेल तो कसा दिसून आला याचाही विचार इथे व्हायला हवा. नवे शैक्षणिक धोरण २०२० साली जाहीर केले गेले, त्याबाबत चर्चा होणे आवश्यक आहे.

नव्या धोरणात पंचसूत्री आहे, ज्यात परवडण्यासारखे शिक्षण व जबाबदारी हे नवीन मुद्दे आहेत; पण त्याची अंमलबजावणी कशाप्रकारे होणार याबाबत साशंकता आहे. अशाच काही बाबींची चर्चा आमच्या प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ‘राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२० चिकित्सा’ या पुस्तकात केली गेलेली पाहायला मिळते. एखादे धोरण बनवत असताना त्याबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा होणे अपेक्षित असते; मात्र या धोरणाबाबत तसे झाले नाही. कोरोना महामारीच्या काळात हे धोरण जाहीर झाले, त्यामुळे त्यावर अपेक्षित चर्चा झाली नाही. याबाबत सर्वसामान्य माणसांना माहिती व्हायला हवी यासाठी हे पुस्तक महत्त्वाचे ठरते.



शैक्षणिक धोरणात जमेच्या बाजू जशा आहेत तशा काही उणिवाही आहेत. त्याचा आढावा घेतलेला

या पुस्तकात पाहायला मिळतो. शैक्षणिक धोरणात ज्या जमेच्या बाजू आहेत त्या शासनाच्या वतीने लोकांसमोर पोहोचवल्या गेल्या हे दिसून येते; मात्र त्यावरही म्हणावी अशी चर्चा झाल्याचे दिसून आले नाही. याचाच विचार करून डॉ. भालबा विभूते यांनी 'राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०२०-चिकित्सा' या पुस्तकात सर्व बाबींचा अभ्यास करून सांगोपांग चिकित्सात्मक चर्चा केलेली पाहायला मिळते.

या धोरणाची अंमलबजावणी होईलच; मात्र ती कशाप्रकारे होईल व त्याबाबत लोकांच्या मनात काही गोंधळ आहेत त्याबाबत पुरेशी चर्चा होणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या चर्चा आणि विचारविनिमय यातून हे धोरण सहज, सोप्या भाषेत सर्वसामान्य लोकांनाही समजावे, हा त्यामागचा महत्त्वाचा हेतू आहे. गेल्या जूनमध्ये हे पुस्तक वाचकांसाठी उपलब्ध झाले, आज त्याला एक वर्ष पूर्ण होत आहे.

शैक्षणिक धोरण हा थोडासा अवघड असा विषय. सहसा अशा पुस्तकांना वाचक लाभतो तो शिक्षण क्षेत्रात काम करणारे लोक अथवा त्याबाबत कुतूहल असणारे असे लोक. तरीही या पुस्तकाला चांगला प्रतिसाद मिळाला हे अभिमानाने इथे सांगावेसे वाटते. मराठीतील हे पहिलेच पुस्तक असावे, ज्यात नव्या शैक्षणिक धोरणावर पुरेशी अशी चर्चा झालेली पाहायला मिळते. अशा विषयावरील एक महत्त्वपूर्ण व अभ्यासपूर्ण पुस्तक आम्ही वाचकांपर्यंत पोहोचवू शकलो, याचे वेगळे समाधान या निमित्ताने वाटते.

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

Find us on:
facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# एक एक पान घडताना...



– *अनिल मेहता*

*कोल्हापूरच्या (कागलच्या) सरस्वतीपुत्राचा अर्थात आनंद यादवांचा मराठी साहित्यसृष्टीतील अनोखा प्रवास हा वाचकांना वास्तवतेचा निर्मळ आरसा दाखवणारा ठरला. ग्रामीण साहित्यनिर्मिती, काव्य, कथा, कादंबरी, समीक्षा, ललित लेखन, अशा साहित्यप्रकारात लिखाण केले. आपल्या चाळीस एक पुस्तकांतून त्यांनी निसर्ग हाच परमेश्वर मानून जीवनातील प्रयत्नवाद शिकवला, संकटसमयी लढण्याची वृत्ती शिकवली. सच्चेपणा, साधेपणा, सहकार्य आणि अंतरातली माणुसकी हाच जीवनाचा मूलाधार मानला. म्हणूनच त्यांच्या सहवासातील मित्र, साहित्यिक गोतावळा वाढतच राहिला...'झोंबी' आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला, तेव्हा प्रत्येकाला आपला लेखक - आपल्या कुटुंबातील व्यक्तीलाच हा पुरस्कार मिळाला आहे, असे वाटले. हेच या लेखकाचे मोठेपण म्हणता येईल. आपल्या उत्कृष्ट कलाकृतीतून लेखक - कलावंत अमर होत असतात. पुढच्या पिढीसाठीचा दीपस्तंभ ठरत असतात.*

*आनंद यादव पुस्तकांतून कायम भेटतच राहतील व 'अनोखा आनंद' उधळत राहतील. आजही त्यांच्या मैत्रीची 'आनंददायी स्पंदने' साद घालत आहेत, हेच खरे!*



## मैत्र सर्जकांशी - आनंद यादव

यादव आज नाहीत. पण आजही मला तसं वाटत नाही, त्यांची आठवण होत नाही, असा एकही दिवस जात नाही. परवा ‘विशाखा’चा २००३ चा दिवाळी अंक चाळत होतो. त्यात त्यांनी आमच्या मैत्रीविषयी व माझ्याविषयी लिहिलं आहे. ते लिहितात-

‘आमची मैत्री दृढ व्हायला दोन कारणं होती. अनिल मेहता हे निपाणीचे तर मी कागलचा. ही दोन्ही गावं पूर्वीपासूनच एकमेकांशी अनेक प्रकारचे व्यावसायिक सबंध ठेवून आहेत. त्यामुळं त्यांच्यात सतत दळणवळण असते. त्यामुळं मेहता मला ‘गाववाले’च वाटू लागले. दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे त्यांचा बोलका, गप्पाळू आणि वाङ्मयप्रेमी स्वभाव. सतत हसतमुख आणि विनोदाची फोडणी आपल्या बोलण्याला देणारा. त्यामुळं ते नेहमी मित्रांच्या कोंडाळ्यात असत. यांतूनच आमची मैत्री घडत आणि वाढत गेली.’

यादवांचे ते लेखन वाचताना माझ्या डोळ्यांसमोर कॉलेज वयातले दिवस तरळून गेले.

आनंद यादव व माझा परिचय कॉलेज वयापासूनचा. रमण गांधी, रवींद्र व्होरा, अनिल गांधी, सुधाकर पाटील असा आमचा ग्रुप होता. त्यांपैकी सुधाकर पाटील यांचे आनंद यादव हे मित्र होते. ते कोल्हापुरात गोखले कॉलेजला शिकायचे. तेही आमच्या ग्रुपमध्ये मिसळले. पुढं मी पुण्यात बी. एम. सी. सी. कॉलेजात बी. कॉम.ला असताना आनंद यादव एम.ए.मराठीसाठी पुणे विद्यापीठात होते व तिथंही आम्हा दोघांच्या एकसमान मित्रांमुळं आमची मैत्री कायम राहिली.

नंतर कॉलेज संपल्यावर खरं तर आमचा संपर्क फारसा नव्हता, पण ‘माळावरची मैना’ हे त्यांचं पुस्तक त्यांनी मला प्रकाशित करण्यासाठी दिलं आणि त्यांच्या व माझ्या मैत्रीचा प्रवास पुन्हा नव्यानं सुरू झाला. त्यांच्यामुळं पुण्यात ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ सुरू झालं व त्याचाही प्रवास सुरू झाला.

आनंद यादव हे ग्रामीण साहित्य चळवळीतील अग्रणी होते. सर्जनशील लेखक आणि ग्रामीण साहित्य चळवळीतील कार्यकर्ता अशी दुहेरी भूमिका त्यांनी निभावली. या चळवळीत अनेक नवे लेखक तयार झाले होते, पण ते लेखक नवे असल्यानं त्यांचं साहित्य प्रकाशित करण्यास कोणी धजावत नव्हतं. आनंद यादवांकडं अनेक ग्रामीण लेखक येत. त्यांना ते त्यांच्या नवीन

लिहिलेल्या पुस्तकांची हस्तलिखितं वाचायला देत. त्यातली आवडलेली व महत्त्वाची वाटणारी काही हस्तलिखितं यादव माझ्याकडं प्रकाशित करण्यासाठी देत. माझा यादवांवर पूर्ण विश्वास होता. मी त्यांच्या शब्दाबाहेर नव्हतो. त्यामुळं यादवांमुळं अनेक नवीन लेखकांची उत्तमोत्तम पुस्तकं प्रकाशित करण्याची मला संधी मिळाली.

पुण्यात ऑफिसवर ते कायम येत. आमच्या साहित्यिक गप्पा होत. रणजित देसाई ऑफिसवर येत तेव्हा ते आवर्जून येत. त्या दोघांच्या गप्पा रंगत. दोघंही आपापल्या कादंबऱ्यांविषयीच्या कल्पना सांगत. त्यावर चर्चा होत असे. मला ती आवडत असे. मी ऐकत बसायचो. आम्ही तिघांनी एकत्र बराच प्रवास केला. कोवाडला रणजीत देसाईंच्या घरी दोनदोन - तीनतीन दिवस आम्ही एकत्र राहायचो. मुंबईत काही वेळा कामानिमित्त मी व आनंद यादव एकत्रच जायचो. त्यावेळी सचिन तेंडुलकर यांचे वडील रमेश तेंडुलकर 'साहित्य सहवास' कॉलनीमध्ये राहत. त्यांना रसग्रहणात्मक पुस्तक प्रकाशित करायचं होतं. त्यांना कोणी प्रकाशक मिळाला नव्हता. यादवांच्या सांगण्यानुसार मी त्यांचं, 'मराठी रोमँटिक काव्यप्रतिभा' हे पुस्तक प्रकाशित केलं.

पुढे पुण्यातली प्रकाशन संस्था सुनील पाहू लागला. तेव्हा सुनीलला भेटायला ते रोज ऑफिसमध्ये येत. सुनील ज्या झपाट्यानं काम करतो, ते पाहून त्याचा त्यांना आनंद होई. 'हा मुलगा प्रकाशन संस्था खूप मोठी करेल,' असं ते म्हणत.

मला नेहमी असं वाटतं, की प्रकाशकाला आपल्या लेखकाला सांभाळता आलं पाहिजे. आजपर्यंत आमच्याकडं जेवढे लेखक आले, त्यातील बऱ्यापैकी आम्ही सांभाळले आहेत. त्यांची 'माउली' ही कादंबरी आम्ही छापली व ती ज्या वेळी बायडिंग होऊन माझ्या हातात आली, त्यावेळी मला असं दिसून आलं की, वापरलेला जो टाईप होता तो अजिबातच व्यवस्थित नव्हता. म्हणजे त्या काळात खिळे जुळवायची पद्धत होती, डीटीपीची नव्हती. माझ्या लक्षात आलं, की हे पुस्तक अजिबात व्यवस्थित झालेलं नाही. म्हणून मी छापलेल्या त्या एक हजार प्रती बाद केल्या. प्रिंटिंग करणाऱ्या मालकाला त्याची जाणीव झाली. त्यांनी ते पुस्तक पुन्हा छापून दिलं. माझ्याकडनं फक्त कागदाचा खर्च घेतला. मी एक हजार प्रतींच्या पुस्तकांचे दोन तुकडे केले, हे बघितल्यानंतर आनंद यादव यांच्या मनात माझ्याबद्दल विश्वास व प्रेमाची

भावना अशी निर्माण झाली, की मेहतांना सगळं काम व्यवस्थितच लागतं. या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची आठवण सांगतो. हे पुस्तक प्रिंटिंग होऊन जवळजवळ सहा महिने पडून होतं. कारण त्याचं मुखपृष्ठ मनाजोगतं होत नव्हतं. या काळात चित्रकार रविमुकुल आमच्याकडं काम करायचे थांबले होते.मी चंद्रमोहन यांना पुस्तकाच्या मुखपृष्ठाची कल्पना सांगितली. त्यांनी ते अप्रतिम केलं. मुखपृष्ठाला वेळ लागला; पण पुस्तकाला न्याय मिळाला.

आपल्या लेखकाची सर्व पुस्तकं आपल्याकडं हवीत. हे धोरण मी कायम ठेवत आलोय. त्याचं मुख्य कारण म्हणजे पुस्तक विक्रेत्याला पुस्तकांची ऑर्डर देताना, अमुक एका लेखकाचं पुस्तक कुठं मिळतं? हा प्रश्न पडला, तर त्याचं उत्तर मेहतांकडं. असं सोपं जावं. एका लेखकाची पुस्तकं एकाच प्रकाशकाकडं असणं, हे आजही मला फार महत्त्वाचं वाटतं. आनंद यादव आमच्या प्रकाशन संस्थेवर खूश होते. हळूहळू त्यांची सगळी पुस्तकं मी नव्यानं प्रकाशित केली. त्यामुळं आज संपूर्ण आनंद यादव यांची पुस्तकं माझ्याकडं आहेत.

पुढं २००३ मध्ये सुनीलनं बाजीराव रोडवर जेव्हा 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची इमारत बांधली, तेव्हा नव्या कार्पोरेट ऑफिसचं उद्‌घाटन कोण करणार? म्हटल्यावर हा मान आनंद यादवांना व अरुण शौरींना द्यायला हवा, असं सुनीलला व मला वाटलं. त्याप्रमाणं त्यांच्या हस्ते आम्ही उद्‌घाटन केलं. याचं कारण 'मेहता पब्लिशिंग हाऊस' पुण्यात सुरू होण्यात आनंद यादवच कारण ठरले होते व त्यांचं मला नेहमीच मोठं सहकार्य मिळत आलं होतं. एकमेकांची सुख-दुःखं, व्यावसायिक, घरगुती प्रश्न हे सगळं आम्ही एकमेकांत शेअर करायचो. आमचं नातं मित्रापेक्षाही भावाप्रमाणेच झालं होतं.

आनंद यादवांची घरची परिस्थिती लहानपणी अत्यंत हलाखीची होती. त्यांची 'झोंबी' ही कादंबरी वाचताना मी कितीतरी वेळा रडलो आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी शिक्षण घेतलं होतं. त्यातला आनंद यादवांचा शालेय जीवनातील एक किस्सा असा, की त्यांच्या लहानपणी वर्गात एकदा शिक्षक एका मोठ्या कवीची शेतीवरची कविता शिकवत होते. पण कवी शेतकरी नसावा, त्याला शेतीचा अनुभव नसणार, हे यादवांनी ओळखलं. त्यांनी कवितेतली चूक शिक्षकांच्या लक्षात आणून दिली. शिक्षकांनी तेव्हाच म्हटलेलं, की 'हा मुलगा हुशार आहे. आपल्या शाळेचं नाव काढेल,'

आणि तसंच घडलं.

कागलसारख्या छोट्या गावातला माझा हा मित्र पुणे विद्यापीठात विभागप्रमुख झाला. काव्य, कथा, कादंबरी, समीक्षा, ललित अशा विविध साहित्य प्रकारांत त्यांनी लेखन केलं. त्यांची 'गोतावळा' ही कादंबरी लक्षवेधी ठरली. तर 'झोंबी' या आत्मचरित्रपर कादंबरीला १९९० मध्ये 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार प्राप्त झाला. या कादंबरीमुळं डॉ. आनंद यादव यांची संपूर्ण देशाला ओळख झाली. ही कादंबरी अनेक भारतीय भाषांमध्ये अनुवादित झाली. अनेक तरुणांनी या कादंबरीची पारायणं केली. 'झोंबी' तील नायकाशी तरुण पिढी समरस झाली. त्यानंतरही 'नांगरणी,' 'घरभिंती,' 'काचवेल', 'झाडवाटा', 'उगवती मने' यांसह त्यांची अनेक पुस्तकं लोकप्रिय झाली. राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील अनेक सन्मान त्यांना मिळाले. अनेक संमेलनांचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं आणि मित्र म्हणून हे सगळं बघण्याचं भाग्य मला लाभलं.

पुण्यात धनकवडीला 'कलानगर'मध्ये त्यांचा 'भूमी' नावाचा एक छोटासा बंगला आहे. त्यांना दोन मुली व एक मुलगा. वहिनी नोकरी करणाऱ्या. मी बऱ्याचदा त्यांच्या घरी जात असे. त्यांनी आपल्या बंगल्याभोवती आंबा, चिकू, पेरू, गुलाब, मोगरा अशी अनेक फळझाडं व फुलझाडं लावलेली. ज्या-ज्या वेळी मी त्यांच्याकडं जात असे, त्या वेळी गप्पा मारायला आम्ही त्या झाडांखाली बसत असू. त्या वेळी ते मला त्या प्रत्येक झाडाची माहिती सांगत असत; जी मला फारशी नव्हती. मी निसर्गात फारसा कधी गेलो नाही. त्यांना निसर्गाची आवड व ओढही होती. ग्रामीण भागात आम्ही कधी गेलो तर प्रवास करतानाही ते निसर्गाबद्दल तासन्‌तास बोलत असत. ते मला नदीकाठी गप्पा मारायला नेत. त्यांची निसर्गाविषयीची माहिती व निरीक्षणं अफाट होती. त्यांच्यामुळं मला निसर्ग समजू लागला. सामान्य माणूस व लेखक बघतो तो निसर्ग जरी एकच असला, तरी दृष्टिकोन किती भिन्न असू शकतात, त्या नजरेतून सौंदर्य पाहणं किती आनंददायी असू शकतं, हे मला त्यांच्यामुळं समजलं.

त्यांचा स्वभाव अतिशय विनोदी होता. ते नकला करत. विनोद सांगत. त्यांनी एकदा सांगितलेलं, की लहानपणी चौथी-पाचवीत असताना ते चोरून तमाशा बघायला जात व त्यातल्या बायका जी गाणी, वग, गवळणी म्हणत त्याची ते हुबेहूब नक्कल करत. त्यांची निरीक्षण शक्ती खूप चांगली होती.

त्यामुळंच असेल की, त्यांच्या 'नटरंग' या कादंबरीवरचा 'नटरंग' नावाचा चित्रपट जेव्हा आला तेव्हा तो प्रदर्शित होण्यापूर्वी तो त्यांनी संपूर्ण बघितला व त्यात काही महत्त्वाचे बदल सुचवले व त्याप्रमाणे दिग्दर्शकानंही त्यात बदल केले.

त्यांच्यासोबत मी खूप फिरलो. त्यांना सर्व ठिकाणी खूप सन्मानानं वागवलं जाई. पण तरीही अतिशय निगर्वी, जमिनीवर असणारा हा साधा माणूस होता. त्यांनी कधीही कोणाकडून मान-सन्मानाची अपेक्षा केली नाही. त्यांना संमेलनाला किंवा भाषणाला कुठंही बोलावलं तर ते स्वत:च्या खर्चानं एस. टी.नं जात. गाडी पाठवा, अमुक अमुक मानधन द्या, एवढा अतिरिक्त खर्च द्या, असं कधीच नव्हतं. काही सरकारी समित्यांवर ते होते. त्यावेळीही मी बघायचो, की ते बसनेच जायचे. इतर लोक मात्र मी कार घेऊन आलो, फस्ट क्लासनं आलो म्हणून खर्च मागायचे. ग्रामीण साहित्य सभेला जाताना मानधनाची अपेक्षा तर नाहीच, पण सोबत आपल्या जेवणाचा डबाही ते घेऊन जात. आपला भार कोणावर टाकायला त्यांना आवडत नसे. त्यांनी महाराष्ट्रभर फिरून ग्रामीण साहित्य संमेलने घेतली. आम्ही एकदा औरंगाबादला गेलो होतो. लेखक नागनाथ कोत्तापल्ले विद्यापीठातील क्वॉर्टर्समध्ये राहत होते. पत्रकार महावीर जोंधळेही आमच्यासोबत होते. आम्ही तिथं राहिलो. रात्री मी म्हटलं,

''चला, बाहेर जेवून येऊ,''

तर यादव म्हणाले, ''बाहेर कशाला? आपण इथंच जेऊ. मी करतो स्वयंपाक.''

आणि नागनाथ कोत्तापल्ले आणि त्यांनी मिळून पिठलं व भाकरी बनवली. आम्ही ते खाल्लं, असा हा माणूस. कोणाला आपला त्रास होणार नाही, याची काळजी घेणारा.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून जेव्हा त्यांची निवड झाली, तेव्हा कोल्हापूरला त्यांचा सत्कार ठेवलेला होता. कार्यक्रम वेळेवर चालू होणार होता. विक्रमसिंह घाटगे, लक्ष्मीकांत देशमुख वगैरे मंडळी होती. यादवांची गाडी कोल्हापूरला उशिरा पोहोचली. प्रवासातला शर्ट त्यांना बदलायचा होता, पण त्याहीपेक्षा वेळेत जाणं त्यांना महत्त्वाचं वाटलं. ते शर्टही न बदलता तशाच चुरगळलेल्या शर्टात व्यासपीठावर गेले. इतका

नावलौकिक मिळूनही आपण कोणी वेगळे आहोत, असं ते कधी वागले नाहीत.

'साहित्य अकादमी'चा पुरस्कार त्यांना जाहीर झाला, तेव्हा मात्र दिल्लीला आपण विमानानंच जाऊ यात, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. कारण त्यांनी विमानप्रवास कधीच केला नव्हता. त्यांची कन्या कीर्ती यादव व मी, आम्ही विमानानं गेलो.

नावाप्रमाणं नेहमी आनंदी व अतिशय उत्साही असलेले हे माझे मित्र, पण एक गोष्ट ते मला बऱ्याचदा सांगत,

''माझं पोट फार वेळा बिघडतं. याचं कारण लहानपणी गरिबीत भूक भागवण्यासाठी ज्या काही गोष्टी खाल्ल्या आहेत, ते आहे. मला माहीत नाही की हा आजार मला कुठपर्यंत घेऊन जाणार आहे?''

नाहीतर बाकी त्यांची तब्बेत उत्तम होती. शेवटपर्यंत ते रोज संध्याकाळी फिरायला जात होते. खाणंपिणंही व्यवस्थित होतं.

'संतसूर्य तुकाराम' या पुस्तकानंतर त्यांना विस्मरणाचा त्रास सुरू झाला.

महाबळेश्वरच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आनंद यादवांची निवड झाली, तेव्हा वारकरी संप्रदायाच्या काही लोकांनी त्यांच्या 'संतसूर्य तुकाराम' पुस्तकावर आक्षेप घेत खूप गोंधळ माजवला. त्यांच्याकडून त्यांना बऱ्याच धमक्या येत होत्या. त्यामुळं त्यांना पोलीस सुरक्षा होती. संमेलन सुरू होण्याआधी सुनीलनं तिथं पुस्तकांचं दालन लावलं होतं. सुनीलनं संयोजकांना विनंती केली, की 'यादवांच्या भाषणाची प्रत तुम्ही माझ्याकडं द्या, मी ती छापून उद्या सर्वांना देतो.' पण ते लोकही आडमुठे. त्यांनी नकार दिला. बराच गोंधळ झाला. सुनील त्या लोकांवर खूप चिडला होता. हे सर्व अनेक पत्रकार पाहत होते. अनेकांनी सुनीलची बाजू उचलून धरली होती. संयोजकांनी शेवटपर्यंत ती प्रत दिलीच नाही. पत्रकारांनी सुनीलला आवरलं तेव्हा तो शांत झाला.


यादवांनी अनेक लेखकांना 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे पुढं आणलं, ही फार मोठी गोष्ट होती. पण नंतर त्यातल्या काहींनी केवळ आपल्या स्वार्थासाठी यादवांकडे पाठ फिरवली. एवढेच नाही, तर त्यांच्यावर वैयक्तिक टीका करायलाही मागं-पुढं पाहिलं नाही. अशा मंडळींविषयी त्यांच्या मनात शेवटपर्यंत एक पश्चात्तापाची भावना टोचत होती.


एक दिवस अचानक त्यांना डॉक्टरांकडं नेल्यावर त्यांनी उपचार करून घ्यायचंच नाकारलं आणि त्याच रात्री त्यांचा मृत्यू झाला. त्यावेळी मी कोल्हापुरात होतो. मी तातडीनं निघालो. रात्री अकरा पर्यंत मी आणि सुनील, पुण्यात पोहचलो. त्यांचं अंत्यदर्शन घेता आलं, पण माझा अतिशय जिवाभावाचा, सावलीसारखा सोबत करणारा मित्र कायमचा गेला. आजही मला ती पोकळी जाणवते. यादवांचे उपकार मी कधीही विसरू शकत नाही.

आनंद यादव गेल्यानंतर इंद्रजित भालेरावांचं यादवांबद्दल लिहिलेलं. एक मोठं पत्र मला आलं होतं. त्या वेळी गणेश देशमुख, इंद्रजित भालेराव व त्यांचे काही मित्र या सगळ्यांनी एकत्र येऊन मला सांगितलं, की त्यांच्याविषयीच्या आठवणींवर किंवा त्यांच्या साहित्यावर एक ग्रंथ प्रकाशित करू या आणि मी ते ताबडतोब मनावर घेतलं. यादवांवर माझं जे एक मित्रप्रेम होतं, त्याची नोंद कुठंतरी व्हावी, असं मलाही वाटत होतं. त्यांची मुलगी डॉ. कीर्ती मुळीक आणि त्यांचे भाऊ आप्पासाहेब जकाते-यादव जे आज कागलमध्ये आहेत. त्यांनी 'डॉ. आनंद यादव-एक साहित्यिक प्रवास' हा ग्रंथ संपादित केला. अतिशय सुबक पद्धतीनं हा ग्रंथ छापला आहे. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी खूप चांगल्या प्रकारे तो सजवला आहे. या ग्रंथाला 'आपटे ग्रंथ वाचन मंदिर'चं पारितोषिक मिळालं. हा ग्रंथ मी ज्या-ज्या वेळी पाहतो त्या-त्या वेळी माझ्या डोळ्यांसमोर यादवांच्या सर्व जुन्या आठवणी येतात.

◆







पु

र

स्का


र

## ‘उत्कृष्ट संशोधन साहित्य पुरस्कार’



मेहता पब्लिशिंग हाऊसच्या लेखिका डॉ. सुवर्णा नाईक- निंबाळकर यांना ‘करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब’ या कादंबरीसाठी वाचनकट्टा, कोल्हापूर तर्फे दिला जाणारा ‘उत्कृष्ट संशोधन साहित्य पुरस्कार’ प्राप्त झाला आहे.


‘मेहता पब्लिशिंग हाऊस’तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन...




आपले लेखक श्री. वसंत गायकवाड यांना ‘तथागत गोतम बुद्ध’ या कादंबरीसाठी ‘दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,’ कोल्हापूर तर्फे दिला जाणारा ‘देवदत्त पाटील पुरस्कार’ आणि ‘मुक्त सृजन साहित्य पत्रिके’ तर्फे ‘मुक्त सृजन कादंबरी पुरस्कार’ प्राप्त झाला. ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन...!

◆






**नवी संहिता... नवा आशय...**

## द मदर




**पर्ल एस. बक**

अनुवाद : **भारती पांडे**

आई... नवरा असूनही झाली विधवा... मातृत्वाचा वसा मात्र जपला...
एका आईच्या जीवनाचं बहुपदरी भावनाट्य

**किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

## गॉडफादर्स ऑफ क्राइम




**शीला रावळ**

दाऊद, अबू सालेम, छोटा राजन... अंडरवर्ल्ड मधील महत्त्वाची नावं... त्यांच्यासारख्या गुन्हेगारांच्या जीवनाचा एका पत्रकाराने निर्भयपणे मांडलेला लेखाजोखा

**किंमत : ४२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

उ

प

क्र

म

## ‘राझ महाल’विषयी रंगली प्रश्नोत्तरे


आपल्या पहिल्याच पुस्तकामुळे प्रसिद्धीच्या झोतात येणारे खूप कमी लेखक असतात. त्यापैकीच एक म्हणजे नील नेथन. ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’तर्फे जानेवारी २०२३ मध्ये प्रकाशित झालेली त्यांची ही अनुवादित कादंबरी त्यामुळेच खास चर्चेचा विषय ठरली आहे.

पहिल्याच कादंबरीत एखादं रहस्य उलगडताना त्यात रंजकता पेरत जाणे, हे लेखक नील नेथन यांनी आपल्या ‘राझ महाल’मधून सहज साध्य केले आहे. उत्कंठा आणि अद्भुताच्या अनुभूतीत गुंतवणारं हे अफलातून कथानक... म्हणजे ‘राझ महाल.’ या कादंबरीच्या निमित्ताने आपले लाडके लेखक नील नेथन वाचकांच्या भेटीला आले होते. पुस्तकाच्या अनुवादक गौरी देशपांडेही यावेळी उपस्थित होत्या. हा कार्यक्रम शुक्रवार दि. १२ मे रोजी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनात पार पडला.

या लेखक-अनुवादक गप्पांच्यावेळी अनुवादक गौरी देशपांडेंनी कादंबरीच्या विषयाबाबत आणि त्यावरील संशोधनाबाबत प्रश्न विचारला. त्यावर बोलताना लेखक नील नेथन म्हणाले, ‘मुळातच पुरातत्त्व विषयातील आवड आणि त्यातील संशोधनाबद्दलचे कुतूहल यामुळे याविषयी लिहिण्याची इच्छा निर्माण झाली. सुरुवातीला या विषयावरील संशोधनातून एखादा प्रबंधसदृश लेख किवा कथा होऊ शकेल, असा विचार करून लेखनाला सुरुवात केली; परंतु तीन-पानी लेखाची तीनशे पानी कादंबरी कशी झाली, याचं मलाही आश्चर्य वाटतं.’ यात आपल्या कुटुंबाची खूप साथ लाभली, असंही ते यावेळी म्हणाले.



कादंबरीत अनेक जिवंत व्यक्तिरेखा तर आहेतच; पण 'ताजमहाल' ही स्वत:च एक व्यक्तिरेखा असल्याचे ते म्हणाले. कादंबरीत जाणीवपूर्वक काही पदर मोकळे सोडल्याचे दिसून येते. तर कादंबरीचा पुढील भागही आणण्याचा विचार आहे का, या प्रश्नावर त्यांनी या विषयावर पुढेही संशोधन चालू असल्याचे सांगितले. तसेच कादंबरीचा पुढचा भाग लिहिण्याची इच्छाही व्यक्त केली.



अनुवादाविषयी बोलताना अनुवादक गौरी देशपांडे म्हणाल्या, की 'पुस्तकाचा अनुवाद करताना त्याचं भाषांतर रटाळ न होता ते त्याच भाषेतील पुस्तक आहे, असं वाटायला हवं. हे पुस्तक इतकं अभ्यासपूर्ण व संशोधन करून लिहिलं गेलं आहे, की मला त्याचा अनुवाद करणं एक महत्त्वाचा टास्क आहे, असंच वाटत राहिलं. त्यामुळे अनुवाद करायला खूपच मजा आली. अभ्यासपूर्ण घटना, त्यात गुंफलेल्या व्यक्तिरेखा, अनेक गुपितं, गुंतागुंतीचं कथानक या सर्वच गोष्टी पुस्तकाला वेगळंच महत्त्व प्राप्त करून देतात, असंही त्या म्हणाल्या.

वाचकांना नील नेथन यांच्या सहीनिशी हे पुस्तक घेण्याची संधी यावेळी मिळाली. या कार्यक्रमास 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक अखिल मेहता, साहिल मेहता व रूपा मेहता आदी उपस्थित होते.

◆

प्र

का

श

न

## *कर्तृत्वाच्या जोरावर देवत्वाला पोहोचणारं एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणजे शिवाजी महाराज!*
## *- डॉ. अमोल कोल्हे*

छत्रपती शिवरायांच्या जीवनावरील ऐतिहासिक कादंबरी मालिका 'महासम्राट' चा दुसरा खंड 'रणखैंदळ.' या खंडाचा प्रकाशनसोहळा रविवार, दि. २१ मे रोजी गोखले इन्स्टिट्यूटच्या काळे सभागृहात पार पडला. या सोहळ्यास सुप्रसिद्ध अभिनेते व खासदार डॉ. अमोल कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या प्रकाशनानिमित्ताने बोलताना विश्वास पाटील म्हणाले की, 'आपण सुट्या-सुट्या पद्धतीने शिवाजी महाराजांचा अभ्यास करतो; परंतु त्यातील अनेक पदर एकमेकांत गुंतलेले असतात. त्याचा सविस्तर अभ्यास करायला हवा. 'महासम्राट'या कादंबरीमालिकेच्या निमित्ताने याचा सविस्तर आढावा घेतला जाईल,' असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. 'संशोधनात्मक लेखन करायचे होते; परंतु ते खूपच कमी लोकांपर्यंत पोहोचते. म्हणून मी 'कादंबरी' हा प्रकार निवडला,' असे विश्वास पाटील यावेळी म्हणाले. शहाजी महाराजांबद्दल बोलताना, 'एवढ्या कीर्तिमान राजाच्या पित्याची समाधी अशी दुर्लक्षित का राहावी?' याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली, तसेच सुनील मेहता यांची आठवण काढताना, 'अशी माणसं भेटणं अवघडच,' असे ते म्हणाले. 'रणखैंदळ' विषयी बोलताना 'पानागणिक महाराजांचे घोडे वाचकांना ओढत नेतील,' असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.



जागतिक पातळीवरच्या पटकथेची उणीव 'महासम्राट' ही कादंबरीमालिका पूर्ण करेल, असा विश्वास खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. कर्तृत्वाच्या जोरावर देवत्वाला

पोहोचणारं एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणजे शिवाजी महाराज! शिवाजी महाराजांची व्यक्तिरेखा साकारताना मी फक्त आभासी प्रतिमा तयार करत असतो. ती स्वीकारायची की नाही, हे प्रेक्षकांनी ठरवायचं, ' असे ते यावेळी म्हणाले.

यावेळी विश्वास पाटील यांच्या स्वाक्षरीसह 'रणखैंदळ' ही कादंबरी घेण्याची सुवर्णसंधी वाचकांना मिळाली.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय वाटवे यांनी केले.

या कार्यक्रमास 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक अखिल मेहता, साहिल मेहता व रूपा मेहता उपस्थित होते.

◆



पु
स्त
का
च्या
पा
नां
तू
न




TBC-31 Book No. 6

# द प्रॉडिगल डॉटर

**जेफ्री आर्चर**

अनुवाद

**डॉ. देवदत्त केतकर**

*फ्लोरेंटिनानं लहानपणीचं राष्ट्राध्यक्ष होण्याचं पाहिलेलं स्वप्न... काँग्रेस सदस्यत्वापासूनचा तिचा राजकीय प्रवास राष्ट्राध्यक्ष पदाकडे सरकत असतो... पण राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक लढवत असतानाच तिला आमिषरूपी धमकी मिळते...दोन घराण्यांचं वैर, प्रेमाचा वसंत आणि राजकीय पटाच्या पार्श्वभूमीवर रंगलेली एका महत्त्वाकांक्षी स्त्रीची जबरदस्त कहाणी...*



फ्लोरेंटिनाचा नामकरण सोहळा ती स्वत: सोडून सगळ्यांसाठी संस्मरणीय ठरला. ती मात्र संपूर्ण समारंभात गाढ झोपली होती. समारंभ होली ट्रिनिटी पोलिश मिशनमध्ये पार पडला. समारंभानंतर पाहुणे मंडळी स्टीवन्स हॉटेलमध्ये आली. तिथे एबलनं एक खासगी हॉल राखून ठेवला होता. तो प्रसंग साजरा करण्यासाठी एबलनं शंभराहून जास्त लोकांना आमंत्रित केलं होतं. एबलचा सर्वांत जवळचा मित्र जॉर्ज नोवॅक

हा फ्लोरेंटिनाचा गॉडफादर झाला, तर झाफियाची मावसबहीण जेनिना ही गॉडमदर.

पाहुण्यांनी दहा कोर्सच्या खास भोजनाचा आस्वाद घेतला. एबल टेबलाच्या एका टोकाला बसून भेटवस्तू स्वीकारत होता. त्यात एक चांदीचा खुळखुळा होता. राष्ट्रीय बचतपत्रं होती. 'हकलबरी फिन'ची एक प्रत होती; पण सर्वांत सुंदर भेट होती ती एबलच्या अनामिक पाठीराख्याची. त्यानं एक पारंपरिक कलाकुसर केलेली पाचूची अंगठी पाठवली होती. त्याला आणि त्याच्या मुलीला भेट स्वीकारण्यात झाला तेवढाच आनंद त्या दात्याला झाला असावा, अशी त्याला आशा होती. त्या प्रसंगी एबलनं त्याच्या मुलीला एक भलं मोठं तपकिरी कापडी अस्वल दिलं. त्याच्या डोळ्यांच्या जागी लाल बटणं होती.

''हा तर फ्रँकलिन डी. रूझवेल्टसारखा दिसतो,'' ते अस्वल उंचावत जॉर्ज म्हणाला. ''आज आणखी एक बारसं झालं पाहिजे— एफडीआर! 'मि. प्रेसिडेन्ट,'', एबल ग्लास उंचावत म्हणाला. नंतर फ्लोरेंटिना त्याला प्रेसिडेन्ट बेअर म्हणू लागली.

अखेर पहाटे तीन वाजता पार्टी संपली. झाफिया फ्लोरेंटिनाला घेऊन कधीच घरी गेली होती. सगळ्या भेटवस्तू घरी घेऊन जायला एबलला हॉटेलच्या लाँड्रीची ढकलगाडी मागवावी लागली. जॉर्जचा निरोप घेऊन एबल ती गाडी लेकशोअर ड्राइव्हच्या फुटपाथवरून ढकलत नेऊ लागला.

त्या आनंदी संध्याकाळच्या आठवणीत तो खुशीत शिट्टी वाजवत चालला होता. त्याची चाल किती नागमोडी होती, हे त्याला प्रेसिडेन्ट अस्वल तिसऱ्यांदा खाली पडल्यावर कळलं. त्यानं ते उचलून बाकी वस्तूंच्या मध्ये कोंबलं. तो सरळ चालायचा प्रयत्न करणार तोच त्याच्या खांद्याला हाताचा स्पर्श झाला. त्यानं चमकून मागे पाहिलं. त्याच्या मुलीच्या वस्तू चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या कुणालाही तो जिवानिशी विरोध करणार होता; पण समोर एक तरुण पोलीस उभा होता.

''पहाटे तीन वाजता तुम्ही स्टीवन्स हॉटेलच्या लाँड्रीची गाडी ढकलत लेकशोअर ड्राइव्हवरून चालला आहात. याचं तुमच्यापाशी सरळसं स्पष्टीकरण असेलच.''

''हो ऑफिसर,'' एबल म्हणाला.

''चला तर, या काय वस्तू आहेत ते पाहू या.''

''फ्रँकलिन डी. रूझवेल्ट सोडून दुसरं काय काय आहे, याची मला मुळीच कल्पना नाही.''

पण, त्या पोलिसाला एबलचं म्हणणं पटेना. त्यानं चोरीच्या आरोपावरून एबलला अटक केली. रिग स्ट्रीटवरच्या त्यांच्या घरी त्या भेटवस्तूंची मालकीण तिचं लाल पिसांचं पांघरूण घेऊन गाढ झोपली होती; पण तिच्या वडिलांना मात्र ती रात्र घोड्याच्या केसांच्या गादीवर तिथल्या स्थानिक तुरुंगात तळमळत काढावी लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी जॉर्जनं कोर्टात येऊन एबलच्या कहाणीला दुजोरा दिला.

❧

त्याच्या लाडक्या फ्लोरेंटिनाला सोडून थोडे दिवसही शिकागो सोडून जाणं एबलला आवडत नसे. तिचं पहिलं पाऊल, पहिला शब्द, पहिलं काहीही आपल्या समोरच व्हावं, अशी त्याची इच्छा होती. तिच्या जन्मदिवसापासून त्याची तिच्या संगोपनावर बारीक नजर होती. ती मोठी झाल्यावर तिच्या सहकाऱ्यांशी बोलताना तिला थोडंही अवघडल्यासारखं होऊ नये म्हणून घरात पोलिश भाषेचा शब्दही बोलायला त्यानं मज्जाव केला होता. तिचा पहिला शब्द ऐकायला तो आसुसला होता. तो शब्द 'पपा' असावा अशी त्याला आशा होती. झाफियाची काळजी मात्र वेगळीच होती. ती एबलच्या अनुपस्थितीत मुलीशी पोलिश बोलत असे. त्यामुळे तिच्या तोंडून पहिला शब्द पोलिश निघतो की काय, ही तिची भीती होती.

''माझी मुलगी अमेरिकन आहे,'' त्यानं झाफियाला सांगितलं होतं, ''त्यामुळे तिनं इंग्लिशच बोललं पाहिजे. अनेक पोल्स आपसात त्यांच्या भाषेत बोलतात. परिणाम काय, तर त्यांच्या मुलांना पूर्ण आयुष्य शिकागोच्या ईशान्य कोपऱ्यात काढावं लागतं आणि सर्वांकडून 'मूर्ख पोलॅक्स' म्हणून हिणवून घ्यावं लागतं.''

''पण, त्यांचे देशबांधव सोडून त्यांना अजूनही पोलिश साम्राज्याबद्दल निष्ठा वाटते,'' झाफियानं बचाव केला.

''पोलिश साम्राज्य?'' एबल म्हणाला. ''झाफिया, कुठल्या शतकात जगतेयस तू?''

''विसाव्या,'' आता तिचाही आवाज चढला.

''डिक ट्रेसी आणि फेयस फनीजबरोबर?''

''पोलंडचा राजदूत म्हणून वॉर्साला जाण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या माणसानं असं बोलू नये.''

''या गोष्टीचा उल्लेख कधीही करायचा नाही, असं मी तुला बजावलं होतं.''

झाफियाचं इंग्रजी अजूनही यथातथाच होतं. तिनं उत्तर दिलं नाही; पण नंतर तिनं तिच्या मावसबहिणीला सांगितलं की, तिच्यात आणि एबलमध्ये दुरावा निर्माण होतोय. एबल बाहेर गेलेला असताना अजूनही ती घरी पोलिश बोलत असे. एबल तिला सतत सांगायचा की, जनरल मोटर्सची वार्षिक उलाढाल पोलंडच्या अर्थसंकल्पापेक्षा जास्त आहे; पण झाफिया त्यामुळे फारशी प्रभावित झाली नाही.

❧

१९३५पर्यंत एबलची खात्री पटली की, अमेरिकन अर्थव्यवस्थेची गाडी रुळावर येतेय आणि महामंदी हा भूतकाळ आहे. त्यानं जुन्या रिचमंड कॉन्टिनेन्टलच्या जागी नवीन शिकागो बॅरन हॉटेल उभारण्याचा निर्णय घेतला. त्यानं त्यासाठी एका वास्तुविशारदाची नेमणूक केली आणि तो स्वत: 'विंडी सिटी' शिकागोमध्ये जास्त काळ राहू लागला. प्रवास कमी झाला. अमेरिकेच्या पश्चिम-मध्य भागातलं हे सर्वोत्तम हॉटेल व्हावं हा त्याचा ध्यास होता.

मे १९३६मध्ये शिकागो बॅरनचं बांधकाम पूर्ण झालं. डेमोक्रॅटिक पक्षाचे महापौर एडवर्ड जे. केली यांच्या हस्ते त्याचं उद्घाटन झालं. इलिनॉय राज्याच्या दोन्ही सेनेटर्सनी आवर्जून हजेरी लावली; कारण एबलच्या वाढत्या सामर्थ्याची त्यांना जाणीव झाली होती.

ज्येष्ठ सेनेटर हॅमिल्टन लुईस म्हणाले, ''दहा लाख डॉलर्सचा अगदी यथायोग्य वापर झालाय.''

''बरोबर.'' एबल म्हणाला. सेनेटर स्वत: तिथले गुबगुबीत गालिचे, सुंदर गिलावा केलेलं छत, फिकट हिरव्या रंगसंगतीतली सजावट हे सगळं कौतुकानं न्याहाळत होते. आणि शेवटची खासियत म्हणजे तिथल्या प्रत्येक वस्तूवर उठावात काढलेलं 'बी' हे अक्षर अगदी बाथरूममधल्या टॉवेलपासून ते ४२व्या मजल्यावर फडकणाऱ्या झेंड्यापर्यंत.

दोन हजार आमंत्रित हजर होते. त्यांना संबोधून बोलताना हॅमिल्टन लुईस म्हणाले, ''इथे यशाची चिन्हं तर जागोजाग दिसत आहेतच; कारण हे हॉटेल

नव्हे, तर त्याचा मालक हाच नेहमी 'शिकागो बॅरन' म्हणून ओळखला जाईल.''

या वाक्यानंतर लोकांनी केलेला जल्लोष पाहून एबल खूश झाला. त्याच्या जनसंपर्क सल्लागारानंच शेवटचं वाक्य सेनेटरांच्या भाषणात घातलं होतं.

एबल आता बडे उद्योजक आणि ज्येष्ठ राजकारणी यांच्यात सहजतेनं वावरू लागला होता. झाफियाला मात्र या नव्या जीवनशैलीशी जुळवून घेणं जड जात होतं. समारंभातही ती काहीशी मागेमागेच होती. शॅम्पेनप्राशन मात्र चालू होतं. अखेर डिनरनंतर, फ्लोरेंटिनाला झोपवायचंय अशी लंगडी सबब सांगून तिनं काढता पाय घेतला. एबल तिला मुख्य फिरत्या दरवाज्यापर्यंत सोडायला आला तेव्हा त्रासलेलाच दिसत होता; पण झाफियाला एबलच्या यशाची ना फिकीर होती, ना समज. या नव्या जगापासून लांब राहणंच तिला पसंत होतं. तिच्या अशा वागण्यानं एबल चिडत असल्याची तिला पुरेपूर जाणीव होती. गाडीत बसताना तिनं टोमणा मारलाच.

''घरी यायची घाई करू नकोस.''

''नाहीच करणार,'' एबल फिरत्या दरवाज्यातून आत येत म्हणाला. चिडून त्यानं दाराला एवढा जोरात धक्का दिला की, तो आत आल्यावरही दारानं तीन गिरक्या घेतल्या.

हॉटेलच्या लॉबीमध्ये तिथला आल्डरमन— ज्येष्ठ महापालिका सदस्य हेन्री ऑस्बॉर्न त्याची वाट पाहत होता.

''हा तुझ्या आयुष्यातला सर्वोच्च क्षण असेल, हो ना?'' ऑस्बॉर्न म्हणाला.

''सर्वोच्च क्षण? मी नुकताच तीस वर्षांचा झालोय.'' एबल म्हणाला. एबलनं त्या उंच, देखण्या राजकारण्याच्या खांद्याभोवती हात टाकला. फटाफट कॅमेऱ्यांचे फ्लॅश उडू लागले. एबल कॅमेऱ्यांच्या दिशेनं पाहून हसला. सेलिब्रिटी म्हणून मिळणाऱ्या वागणुकीचा तो मनापासून आनंद घेत होता. तो मुद्दामच सर्वांना ऐकू जाईल अशा आवाजात म्हणाला, ''मी जगभर बॅरन हॉटेल्स उभी करणार आहे. सीझार रिझ्चं युरोपमध्ये जे स्थान आहे ते मला अमेरिकेत मिळवायचंय. अमेरिकन माणूस कुठेही प्रवास करत असला, तरी बॅरन हे त्याला आपलं दुसरं घर वाटलं पाहिजे.'' इतरांपासून लांब आल्यावर एबल म्हणाला, ''हेन्री, उद्या आपण एकत्र लंच घेऊ या. काही गोष्टींबद्दल तुझ्याशी चर्चा करायची आहे.''

''आनंदानं, एबल. एक सामान्य महापालिका सदस्य बॅरनसाठी नेहमीच उपलब्ध असेल.''

यात हसण्यासारखं काही नसूनही दोघं मनापासून हसले. त्या रात्री एबलला पुन्हा उशीर झाला. घरी आल्यावर झाफियाची झोपमोड होऊ नये म्हणून तो सरळ वेगळ्या बेडरूममध्ये झोपला. निदान त्यानं तिला हे कारण सांगितलं.

सकाळी एबल नाश्ता करायला किचनमध्ये आला. फ्लोरेंटिना तिच्या उंच खुर्चीवर स्थानापन्न होऊन वाडग्यातलं सिरियल खायचा प्रयत्न करत होती. पूर्ण तोंड त्या अन्नानं बरबटलं होतं. वर हाताला येईल ती वस्तू चावण्याचा कार्यक्रम चालू होताच. मग ते अन्न असो वा नसो. त्यानं त्याचे जॅम आणि वॉफल्स संपवले. दुपारचं जेवण हेन्री ऑस्बॉर्नबरोबर घेणार असल्याचं त्यानं सांगितलं.

''मला नाही आवडत तो माणूस,'' झाफिया मनापासून म्हणाली.

''मीही काही त्याच्या फारसा प्रेमात नाही,'' एबल म्हणाला. ''पण, तो महापालिका सदस्य म्हणून आपल्याला बरीच मदत करू शकतो, हे विसरू नकोस.''

''आणि बरंच नुकसानही.''

''उगीचच त्याच्या विचारानं झोप खराब करून घेऊ नकोस. मी बघतो त्याला कसं हाताळायचं ते.'' त्यानं ओझरतं चुंबन घेऊन तिचा निरोप घेतला.

तेवढ्यात त्यांना ''प्रेसिडंक'' असा शब्द ऐकू आला. दोघेही जण फ्लोरेंटिनाकडे पाहतच राहिले. ती तिच्या, खाली पडलेल्या अडीच वर्षांच्या फ्रँकलिन डी. रूझवेल्टकडे हात दाखवत होती.

एबल हसला आणि त्यानं ते टेडीबेअर उचलून खुर्चीवर तिच्याजवळ ठेवलं.

''प्रे...सि...डे़...न्ट,'' तो सावकाश आणि ठामपणे म्हणाला.

''प्रेसिडंक,'' फ्लोरेंटिनाचा हट्ट कायम होता.

एबलनं हसून एफडीआरच्या डोक्यावर थोपटलं. तो आता फक्त नव्या करारासाठीच नव्हे, तर फ्लोरेंटिनाच्या पहिल्या राजकीय शब्दालाही जबाबदार होता.

एबल घराबाहेर पडला. त्याच्या कॅडिलॅकचा शोफर गाडीजवळ उभा होता.

त्यानं एबलसाठी मागचं दार उघडून ठेवलं होतं. जसजशा एबलला महागड्या गाड्या परवडू लागल्या तसतसं त्याचं ड्रायव्हिंगचं कौशल्य कमी कमी होत गेलं. कॅडिलॅक घेतल्यावर मात्र जॉर्जनं त्याला ड्रायव्हर नेमायचा सल्ला दिला. गोल्ड कोस्टजवळ पोचल्यावर त्यानं ड्रायव्हरला वेग कमी करायला सांगितलं. त्यानं शिकागो बॅरनच्या चकाकत्या काचेच्या मनोऱ्याकडे नजर टाकली. जगात अन्यत्र कुठेही इतक्या कमी वेळात एवढं यश साध्य करणं शक्य नव्हतं, याचीच त्याला नवलाई होती. चिनी लोकांनी दहा पिढ्यांत मिळवलं तरी समाधान वाटावं एवढं यश त्यानं अवघ्या पंधरा वर्षांत मिळवलं होतं.

शोफरनं उतरून मागचं दार उघडण्यापूर्वीच एबल पटकन गाडीतून उतरला आणि हॉटेलमध्ये आला आणि त्याच्या खासगी लिफ्टनं ४२व्या मजल्यावर पोचला. नव्या जागी येणाऱ्या बारीकसारीक अडचणी सोडवण्यात त्याची सकाळ निघून गेली. ग्राहकांसाठी असलेली एक लिफ्ट नीट चालत नव्हती. दोन वेटर्स किचनमध्ये सुरे घेऊन एकमेकांच्या अंगावर धावले होते; पण तो पोचण्याआधीच जॉर्जनं त्यांची हकालपट्टी केली होती. एबलच्या लक्षात आलं की, उद्घाटनापासून हॉटेलमध्ये वस्तूंची मोडतोड बरीच झाली होती. एबलला शंका आली की, वेटर्सनी केलेल्या चोऱ्यांची नोंद खतावणीत 'वस्तूंचं नुकसान' अशी होत असावी. प्रत्येक गोष्टीवर त्याची बारीक नजर असे. अगदी प्रेसिडेन्शिअल स्वीटमध्ये कोण राहतंय इथपासून ते आज मागवल्या जाणाऱ्या ताज्या रोल्सच्या किमतीपर्यंत. संपूर्ण सकाळ चौकशी, अडचणी, निर्णय घेणे यात निघून गेली. अखेर आल्डरमन ऑस्बॉर्न त्याच्या ऑफिसात आल्यावरच तो थांबला.

''गुड मॉर्निंग, बॅरन,'' हेन्री म्हणाला. एबलला मोठेपणा देऊन खूश करण्यासाठी त्यानं रोसनोवस्की कुटुंबाचा किताब वापरला.

न्यू यॉर्कच्या 'प्लाझा' हॉटेलमध्ये कनिष्ठ वेटर असताना बॅरन हा किताब उपहासानं वापरला जात असे. रिचमंड कॉन्टिनेन्टलमध्ये सहायक व्यवस्थापक असताना हाच शब्द त्याच्या पाठीमागे कुजबुजला जाई. आता तोच किताब त्याच्या नावाला जोडून मानानं वापरला जात होता.

''गुड मॉर्निंग, आल्डरमन,'' एबल घड्याळावर नजर टाकत म्हणाला. एक वाजून पाच मिनिटं झाली होती. ''चल, लंच घेऊ या.''

एबल, हेन्रीला शेजारच्या खासगी डायनिंग रूममध्ये घेऊन गेला. सहज

पाहणाऱ्याला हेन्री ऑस्बॉर्न हा एबल रोसनोवस्कीचा नैसर्गिक मित्र वाटलाच नसता. हेन्रीचं शिक्षण शोट आणि हार्वर्डमध्ये झालं होतं आणि या गोष्टीची तो एबलला वारंवार आठवण करून देत असे. नंतर त्यानं पहिल्या महायुद्धात एक तरुण लेफ्टनंट म्हणून नौदलात कामगिरी बजावली होती. तो सहा फूट उंच होता. डोक्यावर एखादी रुपेरी रेषा असलेले दाट काळे केस होते. त्याच्या नोंदवल्या गेलेल्या वयापेक्षा तो खूपच तरुण दिसत असे.

रिचमंड कॉन्टिनेन्टलला लागलेल्या आगीच्या संदर्भात त्यांची पहिली भेट झाली होती. हेन्री त्या वेळी 'ग्रेट वेस्टर्न कॅज्युअल्टी' या विमा कंपनीत नोकरी करत होता. याच विमा कंपनीनं अगदी सुरुवातीपासून रिचमंड समूहाला विमाकवच दिलं होतं. हेन्रीनं एबलला सुचवलं की, त्यानं थोडी रोख रक्कम दिली तर त्याची कागदपत्रं लवकर पुढे सरकतील. त्या वेळी एबलकडे त्या काळात 'थोडी रोख रक्कम' नव्हतीच; पण तरीही त्याच्या विम्याचं काम लवकर मार्गी लागलं; कारण हेन्रीचा एबलच्या भवितव्यावर विश्वास होता.

एक गोष्ट मात्र एबल शिकला. ती म्हणजे, काही माणसं विकत घेतली जाऊ शकतात.

हेन्री ऑस्बॉर्न शिकागो महापालिकेचा सदस्य म्हणून निवडून येईपर्यंत एबलला 'थोडी रोख रक्कम' परवडू लागली होती. नव्या बॅरन हॉटेलच्या बांधकाम परवान्याची कागदपत्रं पालिकेत अशा वेगानं पुढे सरकली की, जणू त्यांना चाकं लावली होती. हेन्रीनं नंतर जाहीर केलं की, तो इलिनॉय राज्याच्या नवव्या जिल्ह्यातून लोकप्रतिनिधीच्या जागेसाठी निवडणूक लढवणार होता. त्याला त्याच्या प्रचारमोहिमेला मदत म्हणून एबलकडून पहिला, घसघशीत रकमेचा चेक गेला. एबल या त्याच्या नव्या मित्राबद्दल नेहमीच सावध असे. त्यामुळे या थोड्या रोख रकमेची (अजून तो त्याला लाच म्हणायला तयार नव्हता) नोंद कागदोपत्री कुठेही होणार नाही, याची तो दक्षता घेत असे. त्यामुळे त्याला सोयीस्कर वाटेल तेव्हा तो त्यांची भागीदारी तोडू शकणार होता.

डायनिंग रूममध्येही तीच फिकट हिरवी रंगसंगती होती. फक्त ठळक 'बी' मात्र कुठेही नव्हता. फर्निचर ओक वृक्षापासून १९व्या शतकात बनवलं गेलं होतं. भिंतींवर अनेक पेंटिंग्ज होती. त्यातली बहुतेक परदेशातून मागवली गेली होती. चित्रंही १९व्या शतकात काढली गेली होती. दार बंद झाल्यावर

बाहेरच्या आधुनिक धकाधकीच्या आयुष्यातून वेगळ्याच जगात आल्यासारखं वाटत होतं.

कलाकुसर केलेल्या डायनिंग टेबलाच्या एका टोकाला एबल बसला. आठ जण जेवायला बसू शकतील एवढी जागा होती. आज मात्र तिथं फक्त दोघांच्या जेवणाची तयारी केली होती.

''सतराव्या शतकातल्या इंग्लंडमध्ये आल्यासारखं वाटतंय,'' हेन्री खोलीवर नजर फिरवत म्हणाला.

''किंवा सोळाव्या शतकातल्या पोलंडमध्ये,'' एबल म्हणाला. तेवढ्यात दोन गणवेशधारी वेटर्स आले. एकानं दोघांच्या प्लेटमध्ये भाजलेले सामन मासे वाढले, तर दुसऱ्यानं त्यांचे वाइनचे ग्लास भरले.

हेन्रीनं पुढ्यातल्या भरलेल्या प्लेटवर नजर टाकली. ''बॅरन, आता मला कळलं तुझं वजन का वाढतंय ते,'' तो म्हणाला.

एबलनं कपाळाला आठ्या घालून विषय बदलला. ''उद्याच्या कब्जच्या मॅचला जाणार आहेस?''

''काय अर्थ आहे जाण्यात? त्यांची घरची कामगिरी रिपब्लिकन्सपेक्षा वाईट आहे. मी गेलो न गेलो तरी ट्रिब्यूनमध्ये ठरावीकच बातमी येणार. काहीही गुणसंख्या झाली तरी सामना अटीतटीचा झाला हेच ते सांगणार आणि परिस्थिती वेगळी असती, तर कब्जनी सफाईदार विजय मिळवला असता अशी पुस्ती जोडणार.''

एबल हसला.

हेन्री पुढे म्हणाला, ''पण, एक गोष्ट नक्की. रिगलीला रात्रीचा सामना होणार नाही. फ्लडलाइट्सखाली खेळणं शिकागोत लोकप्रिय होणार नाही.''

''मागच्या वर्षी बिअर कॅन्सबद्दल तू हेच म्हणाला होतास.''

आता हेन्रीच्या कपाळाला आठी पडली. ''बेसबॉल किंवा बिअर कॅन्सविषयी चर्चा करण्यासाठी तू मला लंचला नक्कीच बोलावलेलं नाहीस. तुझ्या कोणत्या योजनेसाठी तुला माझी मदत हवीय?''

''सोपं आहे. या विल्यम केनच्या बाबतीत काय करावं याच्याबद्दल मला तुझा सल्ला हवा आहे.''

हेन्रीच्या घशात घास अडकला. एबल मनात म्हणाला, 'मला शेफला बजावायला हवं, माशांमध्ये काटे मुळीच असता कामा नयेत.'

''हेन्री, तुझी आणि त्याची गाठ पडल्यावर काय घडलं हे मागे तू मला अगदी सविस्तरपणे सांगितलं आहेस. त्यानं तुला फसवून बरेच पैसे उकळले. माझं तर केननं त्याहून जास्त नुकसान केलंय. माझा भागीदार आणि सर्वांत जवळचा मित्र डेव्हिस लेरॉय याची महामंदीच्या काळात त्यानं कोंडी केली. लेरॉयच्या आत्महत्येला तोच थेट जबाबदार आहे आणि कंपनीचा आर्थिक गाडा रुळावर आणण्यासाठी जेव्हा मी व्यवस्थापनाची सूत्रं हाती घेतली तेव्हाही त्यानं मला मदत केली नाही.''

''मग तुला आर्थिक आधार कुणी दिला?'' हेन्रीनं विचारलं.

''कॉन्टिनेन्टल ट्रस्टमध्ये खातं असणारा एक खासगी गुंतवणूकदार. मॅनेजरनं मला स्पष्ट सांगितलं नाही; पण तो डेव्हिड मॅक्सटन असावा, असं मी गृहीत धरलंय.''

''तो स्टीवन्स हॉटेलचा मालक?''

''तोच तो.''

''तोच तुझ्या पाठीशी असावा असं तुला का वाटतं?''

''माझ्या लग्नाचा स्वागत समारंभ आणि फ्लोरेंटिनाचं बारसं हे दोन्ही स्टीवन्स हॉटेलमध्येच झाले आणि माझ्या अनामिक पाठीराख्यानंच दोन्ही वेळी बिल भरलं.''

''पण, त्यानं काही ठाम निष्कर्ष काढता येणार नाही.''

''कबूल; पण तो मॅक्सटन असल्याची मला खात्री आहे; कारण त्यानं मला एकदा स्टीवन्स हॉटेल चालवण्याची संधी देऊ केली होती; पण रिचमंड समूहासाठी आर्थिक पाठबळ असणं माझ्या दृष्टीनं जास्त महत्त्वाचं असल्याचं मी त्याला सांगितलं. त्यानंतर आठवड्याच्या आतच त्याच्या शिकागोतल्या बँकेनं पैसे उपलब्ध झाल्याचं सांगितलं; पण देणाऱ्याचं नाव मात्र सांगितलं नाही; कारण त्यामुळे त्याच्या इतर व्यावसायिक हितसंबंधांना बाधा येणार होती.''

''हं, हे जास्त पटण्यासारखं आहे. मग आता तुझ्या मनात विल्यम केनबद्दल काय योजना आहे ते सांग,'' हेन्री त्याच्या वाइन ग्लासशी चाळा करत म्हणाला.

''त्यासाठी तुला फार वेळ द्यावा लागणार नाही, हेन्री; पण आपल्या दोघांनाही केनची क्षमता ठाऊक असल्यामुळे तुला ते आर्थिक आणि वैयक्तिक

दृष्टीनं फलदायी ठरेल.''

''ऐकतोय मी,'' हेन्री ग्लासवरची नजर न हटवता म्हणाला.

''केनच्या बोस्टनमधल्या बँकेचे समभाग मोठ्या प्रमाणावर घ्यायची माझी इच्छा आहे.''

''ते सोपं नाही,'' हेन्री म्हणाला. ''बहुतेक सगळे समभाग कौटुंबिक विश्वस्त संस्थेकडे आहेत आणि त्याच्या संमतीशिवाय ते विकता येणार नाहीत.''

''बरीच माहिती दिसते तुला,'' एबल म्हणाला.

''सगळ्यांनाच माहीत आहे.'' हेन्री म्हणाला.

यावर एबलचा विश्वास बसला नाही. ''बरं; पण आपण केन अँड कॅबट बँकेच्या सर्व समभागधारकांची नावं शोधून काढू आणि त्यांपैकी कोणीही त्यांचे समभाग बाजारमूल्यापेक्षा बऱ्याच जास्त किमतीला विकायला तयार आहेत, याची चाचपणी करू.''

हेन्रीचे डोळे चमकले. यात त्याला फायदा दिसू लागला. दोन्ही बाजूंशी सौदा करता आला तर उत्तमच, असं त्याला वाटलं.

''पण, तुझे काय उद्योग चाललेयत हे त्याला कळलं तर तो खूपच कठोरपणे वागेल,'' हेन्री म्हणाला.

''त्याला कळणारच नाही,'' एबल म्हणाला. ''आणि जरी कळलं तरी आपण त्याच्यापुढे दोन पावलं असू. हे काम जमेल तुला?''

''प्रयत्न तर करू शकतो. तुझ्या मनात काय आहे?''

हेन्रीला स्वत:ला काय मिळणार याचं उत्तर त्याला हवं असल्याचं एबलच्या लक्षात आलं; पण त्याचं बोलून झालं नव्हतं. ''केनजवळचे कोणत्याही कंपनीचे समभाग, त्याची व्यावसायिक बांधिलकी, त्याचं खासगी आयुष्य याविषयीची सर्व माहिती मला दर महिन्याच्या एक तारखेला लेखी स्वरूपात हवी. मग एखादी गोष्ट कितीही किरकोळ वाटो.''

''पुन्हा सांगतो, हे सोपं नाही,'' हेन्री म्हणाला.

''तुला महिना हजार डॉलर्स मिळाले तर जरा सोपं होईल?''

''पंधराशे,'' हेन्री म्हणाला.

''सुरुवातीचे सहा महिने महिना हजार डॉलर्स. तोपर्यंत काही उपयुक्त माहिती मिळाली तर त्यानंतर पंधराशे.''

‘‘कबूल,’’ हेन्री म्हणाला.

एबलनं कोटाच्या खिशातून पाकीट काढलं आणि आधीच लिहिलेला हजार डॉलर्सचा चेक हेन्रीसमोर धरला.

तो पाहून हेन्री म्हणाला, ‘‘मी कबूल होईन, अशी तुला खात्री होती तर?’’

‘‘पूर्णपणे नव्हती,’’ असं म्हणून एबलनं दुसरा चेक काढून त्याला दाखवला. तो पंधराशे डॉलर्सचा होता. दोघेही हसले.

‘‘चल, आता जरा चांगल्या विषयांवर बोलू या,’’ एबल म्हणाला. ‘‘आपण जिंकणार का?’’

‘‘कब्जची मॅच?’’

‘‘निवडणूक.’’

‘‘नक्कीच. लंडनचा धुव्वा उडणार आहे. कॅन्सासचं सूर्यफूल एफडीआरला हरवू शकत नाही,’’ हेन्री म्हणाला. ‘‘अध्यक्षांनीच सांगितलंय की, ते फूल पिवळं असतं, त्याचं काळीज काळं असतं, पोपटांचं खाद्य म्हणून उत्तम असतं आणि नोव्हेंबरपूर्वी मरून जातं.’’

एबल पुन्हा हसला. ‘‘आणि व्यक्तिशः तुझं काय?’’

‘‘काळजीचं कारण नाही. ही जागा डेमोक्रॅट्ससाठी सुरक्षित आहे. पार्टीकडून नामांकन मिळवणं हेच आव्हान आहे. निवडणूक जिंकणं नाही.’’

‘‘तू काँग्रेसमन झालेला पाहायला मला आवडेल, हेन्री.’’

‘‘तशी खात्री आहे मला, एबल; आणि माझ्या मतदारसंघातल्या सर्वांप्रमाणे मी तुलाही सेवा द्यायला उत्सुक आहे.’’

एबलनं त्याच्याकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं. ‘‘इतरांपेक्षा जास्त देशील अशी आशा आहे.’’ तेवढ्यात त्यांच्या पुढ्यात सरलॉइन स्टेक आणलं गेलं. वाइनचे ग्लास पुन्हा भरले गेले. नंतर मात्र अवांतर गप्पा झाल्या. गॅबी हार्नेटची दुखापत, बर्लिन ऑलिंपिकमध्ये जेसी ओवेन्सची चार सुवर्णपदकं आणि हिटलर पोलंडवर हल्ला करण्याची शक्यता.

‘‘अशक्य,’’ हेन्री म्हणाला. पहिल्या महायुद्धात मॉन्सच्या लढाईतल्या पोलिश सैन्याच्या धैर्याबद्दल तो बोलू लागला.

मॉन्सच्या लढाईत एकही पोलिश तुकडी नव्हती हे एबलनं त्याला सांगितलं नाही.

दुपारी २:३७ ला एबल पुन्हा ऑफिसमध्ये होता आणि प्रेसिडेन्शिअल

स्वीट आणि आठ हजार रोल्सबद्दल विचार करत होता.

रात्री नऊ वाजता तो घरी पोचला. फ्लोरेंटिना गाढ झोपली होती; पण तिचे बाबा नर्सरीत आल्यावर तिनं डोळे उघडले आणि ती त्याच्याकडे पाहून हसली.

''प्रेसिडेन्ट, प्रेसिडेन्ट, प्रेसिडेन्ट.''

एबलनं स्मितहास्य केलं. ''मी नाही, तू होशील कदाचित; पण मी नाही.'' त्यानं हलकेच तिच्या गालाचा पापा घेतला. आणि ती तिच्या शब्दसंग्रहातला तो एकमेव शब्द वारंवार उच्चारत राहिली.

◆


**नवी संहिता ... नवा आशय...**


सुधारित दुसरी आवृत्ती

इथे थबकली गंगामाई

**मनोहर माळगांवकर**

अनुवाद

**श्री. ज. जोशी**





पन्नास वर्षांहून अधिक काळ वाचकांना मोहित करणारी मनोहर माळगांवकर यांची अभिजात साहित्यकृती... संक्रमणावस्थेत असलेल्या राष्ट्राची महाकथा...

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता ... नवा आशय...

# राफिंणू

**डॉ. संजय ढोले**



राजू फिरकेने आपल्या गावाच्या
कोरोनामुक्तीसाठी केलेल्या वैज्ञानिक
प्रयत्नांची यशोगाथा...
कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील विज्ञान कादंबरी

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# क्युअर्ड

**डॉ. जेफ्री रेडिगर**


अनुवाद
**सुप्रिया वकील**




शारीर आजारावर मानसिक आजाराच्या
दिलासादायक मात्रेचा मूलमंत्र देणारं
अफलातून पुस्तक

**किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पु स्त का च्या पा नां तू न




TBC-32 Book No. 1

# द डे ऑफ द जॅकल

**फ्रेडरिक फोरसाइथ**

अनुवाद

**स्वाती देशपांडे**

*जॅकल... तो बनतो कधी धर्मगुरू, तर कधी तृतीयपंथीय...वेगवेगळ्या नावांनी बनवतो पासपोर्ट... त्याचं मिशन आहे फ्रान्सच्या अध्यक्षांची हत्या...धूर्त जॅकल आणि प्रामाणिक पोलीस ऑफिसर लबेल यांच्यातील संघर्षाची थरारक, उत्कंठावर्धक कहाणी*

पॅरिस मधील ११ मार्च १९६३ची सकाळ. वेळ सकाळी सहा वाजून चाळीस मिनिटे. त्या दिवशी सकाळी पॅरिसच्या हवेत गारठा तर होताच, परंतु फोर्ट डिव्हरी किल्ल्याच्या मुख्य पटांगणात लवकरच एका व्यक्तीवर गोळ्या डागल्या जाणार असल्यामुळे तिथले वातावरण जरा जास्तच थिजल्यासारखे वाटत होते. प्रांगणातल्या थंडगार खडीत गाडलेल्या एका खुंटापाशी लेफ्टनंट कर्नल जौं मारी बैस्तियाँ थिरीला उभे करण्यात आले होते. त्याचे हात वधस्तंभाच्या मागे बांधलेले होते. त्याच्यासमोर वीस-एक मीटर अंतरावर बंदूकधारी



शिपायांची एक तुकडी आपापली शस्त्रे सरसावून उभी होती. त्यांच्याकडे एकटक बघणाऱ्या थिरीच्या मनातली स्वत:च्या भविष्याबद्दलची उरलीसुरली आशादेखील संपुष्टात यायला लागली होती.

फ्रान्सच्या हवाई दलातल्या या अधिकाऱ्याच्या वधाची सर्व तयारी झालेली होती. अखेर थिरीच्या डोळ्यांवर पट्टी बांधली गेली. प्रकाशाचे त्याला झालेले ते अखेरचे दर्शन!! कुणाच्यातरी बुटामुळे जमिनीवरची खडी सरकल्याचा आवाज आला. त्या आवाजामुळे अगदी क्षणभरच का होईना, पण वातावरणातला ताण काहीसा कमी झाला. बंदूकधारी सैनिक आपापल्या बंदुका सज्ज करत होते. त्या वीस बंदुकांच्या खटक्यांच्या आवाजात जवळच उभ्या असलेल्या पाद्रीबाबांच्या प्रार्थनेचा आवाज दबून जात होता.

किल्ल्याच्या पटांगणात मृत्युदंडाच्या शिक्षेची अशी तयारी चालू असताना तटबंदीच्या बाहेर मात्र वेगळेच वातावरण होते. शहराच्या दिशेने निघालेल्या एका 'बर्लिएट' ट्रकचा चालक जोराजोराने हॉर्न वाजवून त्याच्या मार्गात येणाऱ्या वाहनांना पांगवू पाहात होता. त्या गलबलाटात किल्ल्याच्या प्रांगणातल्या शिपायांना मिळालेली 'नेम घ्या' ही खड्या आवाजातली आज्ञा काहीशी विरूनच गेली. परंतु तरीही त्या सैनिकांच्या सरावलेल्या कानांनी ती आज्ञा अचूक टिपली अन् बरोबर नेम धरून गोळ्या डागल्या. अर्थात किल्ल्याबाहेर या आवाजाचा फारसा काही परिणाम झाला नाही... कबुतरांचा एक थवा वेगाने आकाशात झेपावला इतकेच! काही सेकंदांतच सैनिकांचा कार्यभाग साधला गेला. किल्ल्याबाहेरची रहदारी नेहमीप्रमाणेच चालू राहिली.

फ्रान्सच्या तत्कालीन अध्यक्षांच्या हत्येचा विडा उचलणाऱ्या 'सिक्रेट आर्मी ऑर्गनायझेशन'च्या नेत्याला मिळालेली ही मृत्युदंडाची शिक्षा खरे तर भविष्यातल्या प्रयत्नांचा अंत ठरायला हवी होती. परंतु दैवदुर्विलास असा की, याच शिक्षेमुळे अध्यक्षांच्या हत्येच्या प्रयत्नांना जास्त बळकटी आली आणि एका नव्या पर्वाला सुरुवात झाली... परंतु त्यामागचे कारण स्पष्ट करण्यापूर्वी सेनादलाच्या त्या किल्लावजा तुरुंगात एका सेनाधिकाऱ्याचा अशा प्रकारे अंत का झाला हे सांगणे आवश्यक आहे.

२२ ऑगस्ट १९६२ या दिवशीची गोष्ट... पॅरिसमध्ये उष्म्याचा कहर झाला होता. पॅरिसवासी सप्ताहंताच्या सुट्टीकरता शहराबाहेर जाण्याच्या गडबडीत होते. गर्मीमुळे त्रस्त झालेल्या बायकांना आणि उन्हामुळे किरकिर करणाऱ्या

लहानग्यांना तेवढाच बदल म्हणून पुरुष मंडळींनी स्वत:च्या गाड्या काढून किंवा आगगाडीने खेड्यातल्या थंड हवेच्या ठिकाणी किंवा समुद्रकाठच्या गावी जाण्याचा बेत केला होता. संध्याकाळी सात वाजतादेखील शहरातले तापमान २३° से.च्या खाली आलेले नव्हते. एकीकडे पॅरिसवासीयांची ही धामधूम चालू होती, तर फ्रान्सच्या अध्यक्षांच्या शासकीय आवासातले म्हणजे 'एलिसी पैलस'मधले चित्र काही वेगळेच होते. पॅलेसच्या तटबंदीवरून सूर्याने अन्यत्र कूच केल्यामुळे पटांगणातल्या सावल्या लांबू लागल्या होत्या अन् त्यामुळे उष्म्यातून थोडीशीतरी सुटका होत होती... 'पॅलेस'च्या आत मंत्रिमंडळाची बैठक चालू होती आणि नेमक्या याच वेळी पॅरिसच्या वेशीबाहेर काही फ्रेंच लोक अध्यक्ष द गॉल यांच्या हत्येची खलबते करण्यात गुंतलेले होते.

उन्हाळ्याच्या त्रासापासून बचाव व्हावा म्हणून शहराबाहेर धाव घेणाऱ्या पॅरिसवासीयांची अशी धांदल चालू असताना 'एलिसी पैलेस'मधील मंत्रिमंडळाची बैठक चालूच राहिली. भव्य दर्शनी द्वार असणाऱ्या त्या प्रासादातील पटांगणाच्या सावलीतल्या भागात सोळा काळ्याशार सित्थोएन डीएस गाड्या गोलाकार रचनेत एकामागे एक अशा उभ्या होत्या. या गाड्यांमुळे प्रांगणाचा तीन चतुर्थांश भाग व्यापून गेलेला होता.

प्रासादाच्या पश्चिम तटबंदीजवळील सावलीत या गाड्यांच्या चालकांनी गप्पांचा फड जमवला होता. त्यांच्या कामाचा बराचसा वेळ आपापल्या धन्यांची वाट बघण्यात जात असल्यामुळे मंडळी काहीतरी निरर्थक गप्पाटप्पा करून वेळ काढत असत.

मात्र त्या दिवशीची बैठक नेहमीपेक्षा जरा जास्तच लांबल्यामुळे चालक मंडळी काहीशी कंटाळून गेली होती अन् त्यांच्या गप्पांमध्ये तक्रारीचा सूरच जास्त डोकावत होता, पण लवकरच त्यांना आपल्या गप्पा आटोपत्या घ्याव्या लागल्या. साडेसात वाजायच्या सुमारास प्रासादाच्या पायऱ्यांच्या वरच्या टोकाशी असलेल्या काचेच्या दाराजवळ हालचाल झाली. दारामागे एक गणवेशधारी सेवक प्रकटला आणि त्याने सुरक्षारक्षकांना उद्देशून खूण केली. त्याचा इशारा पाहाताच चालक मंडळींनी लगबगीने आपल्या सिगारेटी बुटाखाली चिरडल्या, प्रासादाच्या मुख्य द्वाराजवळ तैनात असलेल्या सुरक्षारक्षकांनी 'सावधान'ची स्थिती घेतली आणि द्वारपालांनी प्रासादाचे भव्य लोखंडी दरवाजे खुले केले.

मंत्रिगणांचा पहिला गट काचेच्या दरवाज्यापाशी पोहोचेपर्यंत चालक

मंडळींनी आपापल्या गाड्यांचा ताबा घेतला होता. गणवेशधारी सैनिकाने अदबीने काचेचे दार उघडून धरले व मंत्रिमंडळी बाहेर येऊन लगबगीने पायऱ्या उतरून आपापल्या गाड्यांच्या दिशेने गेली, पण त्यापूर्वी एकमेकांना सप्ताहंताच्या सुट्टीकरता शुभेच्छा द्यायला मात्र ते विसरले नाहीत. अग्रक्रमानुसार एकेक करून मंत्रिगणांच्या गाड्या शेवटच्या पायरीपाशी येऊन थांबत, गणवेशधारी सैनिक अदबीने गाडीचे दार उघडून देई व मंत्रिमहोदय गाडीत बसत. त्यानंतर 'गाहद् रिपब्लिकैन' जथ्याकडून प्रत्येक मंत्रिगणाला मानवंदना दिली जाई अन् एकेक गाडी बाहेर पडून 'फोबुर्ग संत होनोवे' रस्त्याला लागे.

अवघ्या दहा मिनिटांतच सर्व मंत्र्यांच्या गाड्या प्रासादातून बाहेर पडल्या व पटांगण जवळजवळ रिकामे झाले. आता तिथे केवळ दोन लांबलचक डीएस १९ सित्थोएन गाड्या उरल्या होत्या. त्या गाड्याही हळूहळू पायऱ्यांपाशी आणून उभ्या केल्या गेल्या. त्यापैकी पहिली, दिमाखाने झेंडा मिरवणारी गाडी होती फ्रेंच प्रजासत्ताकाचे अध्यक्ष जनरल चार्ल्स द गॉल यांची. त्या गाडीच्या चालकाचे नाव होते फ्रान्सिस मॅरॉक्स. 'सटोरी' इथल्या पोलीस प्रशिक्षण दलातल्या मॅरॉक्सच्या धीरगंभीर स्वभावामुळे इतर मंत्र्यांच्या वाहनचालकांशी त्याचे फारसे सूत जमत नसे. परंतु त्याच्या याच गंभीर, संयमी स्वभावामुळे व वाहनचालनातल्या कौशल्यामुळे त्याची अध्यक्ष द गॉल यांच्या गाडीचा चालक म्हणून निवड करण्यात आली होती. अध्यक्षांची गाडी पायऱ्यांपाशी आली तेव्हा गाडीत मॅरॉक्सशिवाय इतर कुणीच बसलेले नव्हते. त्यामागची दुसरी डीएस १९ गाडीदेखील 'सज्ज' होती. त्या गाडीचा चालकही मॅरॉक्सप्रमाणेच 'सटोरी'तल्या प्रशिक्षण केंद्रातला चालक होता.

बरोब्बर सात वाजून पंचेचाळीस मिनिटांनी अजून एक गट काचेच्या दारापाशी आला अन् सुरक्षारक्षक पुन्हा एकदा 'सावधान' झाले. नेहमीप्रमाणे राखाडी रंगाचा डबल ब्रेस्टेड कोट व टाय घातलेले अध्यक्ष द गॉल त्यांच्या पत्नीसह दाराजवळ आले. स्त्रीदाक्षिण्याच्या आपल्या पद्धतीला अनुसरून त्यांनी मादाम गॉलना प्रथम दारातून बाहेर जाऊ दिले. त्यानंतर अध्यक्षांनी पत्नीचा हात हातात घेतला व दोघेजण पायऱ्या उतरू लागले. पायऱ्यांच्या तळाशी त्यांची सित्थोएन गाडी प्रतीक्षेत उभी होतीच. मादाम गॉल डाव्या बाजूने गाडीत चढल्या, तर अध्यक्ष उजव्या बाजूला जाऊन गाडीत बसले.

गॉल दांपत्यानंतर त्यांचे जावई कर्नल ऐलों द ब्यस्यो गाडीजवळ आले.

मागच्या बाजूची दोन्ही दारे व्यवस्थित बंद झाली आहेत याची खात्री करून ते पुढच्या बाजूने गाडीत चढले अन् चालक मॅरॉक्सच्या बाजूच्या स्थानावर बसले. अध्यक्षांप्रमाणेच त्यांचे जावईदेखील एक सेनाधिकारी होते. त्या काळात ते फ्रान्सच्या लष्करात चिलखतीदल व घोडदळ यांचे प्रमुख म्हणून काम पाहात होते.

अध्यक्ष द गॉल गाडीत बसताच त्यांच्या पाठोपाठ प्रासादाच्या पायऱ्या उतरलेल्या दोन व्यक्ती चटकन मागच्या गाडीत बसल्या. त्यापैकी एक होता अध्यक्षांचा महाकाय सुरक्षारक्षक हेन्री देज़ूदे, तर दुसरी व्यक्ती होती अध्यक्षांच्या सुरक्षादलाचे प्रमुख जौं दूक्रै. हेन्री मूळचा अल्जेरियातल्या कॅबिल प्रांतातला होता. त्याने चालकाच्या शेजारी जागा घेतली अन् डाव्या काखेत दाबून धरलेल्या पिस्तुलावरची पकड थोडीशी सैल केली. गाडीत बसल्या क्षणापासून त्याचे भिरभिरते डोळे सतत समोर नजर ठेवून होते. मात्र त्याची नजर अध्यक्षांच्या गाडीकडे नव्हती, तर पादचारी मार्गावर किंवा रस्त्यातल्या एखाद्या कोपऱ्यात काही संशयास्पद हालचाल तर होत नाही ना याकडे त्याचे सगळे लक्ष लागलेले होते. कमिसार दूक्रै यांनीदेखील गाडीत बसण्यापूर्वी प्रासादात मागे सोडलेल्या सुरक्षारक्षकाला काही सूचना दिल्या होत्या. दोघेही अधिकारी आपले कर्तव्य चोखपणे बजावत होते.

दोन्ही गाड्या सज्ज असल्याचे पाहून प्रासादाच्या पश्चिम तटबंदीच्या बाजूने दोन सफेद हेल्मेटधारी स्वारांनी आपापल्या मोटरसायकली सुरू केल्या. तटबंदीच्या सावलीतून निघालेली ती वाहने प्रासादाच्या मुख्य द्वारापाशी पोचल्यावर दोन्ही स्वारांनी वाहनांना १० फुटांचे अंतर ठेवून उभे केले व एकवार मागे नजर टाकली. ताबडतोब अध्यक्षांच्या चालकाने एक सफाईदार वळण घेऊन गाडी मुख्य द्वाराकडे नेऊन मोटरसायकलींच्या मागे उभी केली. लगोलग दुसरी गाडीही अध्यक्षांच्या गाडीमागे येऊन उभी राहिली. वेळ होती सात वाजून पंचावन्न मिनिटे...

पुन्हा एकदा ते भलेमोठे लोखंडी निकासद्वार उघडले गेले अन् 'सावधान' अवस्थेत ताठ उभ्या असणाऱ्या सुरक्षारक्षकांना मागे टाकत वाहनांची ती दिंडी एखादी प्रेतयात्रा असावी एवढ्या संथपणे बाहेर पडली. फोबुर्ग संत होनोवेच्या टोकाला पोचल्यावर गाड्या आविनु द माहिनी या रस्त्याकडे वळल्या. ते पाहाताच रस्त्याच्या कडेला चेस्टनट वृक्षांच्य्शाा आडोशाला लपून बसलेल्या

एका हेल्मेटधारी युवकाने आपली स्कूटर चालू केली अन् तो गाड्यांचा पाठलाग करू लागला. सप्ताहंताचा दिवस असूनही रस्त्यावरची रहदारी बरीच कमी होती. अध्यक्षांची गाडी त्या मार्गाने जाणार असल्याची काहीच खबर वाहतूक यंत्रणेला दिली गेलेली नव्हती. 'दिंडी'तल्या सुरक्षारक्षकांच्या मोटरसायकलींचे भोंगे वाजू लागले तेव्हा कुठे रस्त्यावर तैनात असलेल्या वाहतूक पोलिसांना गाड्यांच्या आगमनाची वर्दी मिळाली अन् त्यामुळे रस्ते मोकळे करून अध्यक्षांच्या वाहनांना वाट देण्याकरता त्यांची एकच लगबग सुरू झाली. गाड्या रस्त्यावर पोहोचण्याच्या आत रस्त्यावरील वाहतूक थांबवणे आवश्यक होते.

चेस्टनट वृक्षांच्या दाटीमुळे आविनु द माहिनी हा रस्ता काहीसा अंधारलेला होता... या रस्त्यावर पोहोचेपर्यंत गाड्यांच्या ताफ्याने वेग घेतला होता... त्यामुळे लवकरच रस्ता पार करून गाड्या उन्हाने झळाळलेल्या प्लैस क्लिमौंसुवर पोहोचल्या. तिथून पुढचा मार्ग पाँट ॲलेक्झांडर III या पुलावरून जाणार होता. महत्त्वाच्या व्यक्तींच्या गाड्यांचा ताफा जात असल्यामुळे रस्त्यावर इतर वाहने नव्हतीच; त्यामुळे हेल्मेटधारी स्कूटरचालकाला ताफ्याचा पाठलाग करण्यास कोणतीच अडचण आली नाही. पूल पार केल्यानंतर अध्यक्षांच्या चालकाने मोटरसायकलस्वारांच्या मागोमाग गाडी प्रथम आविनु जनरल गैलिएनीवर नेली आणि नंतर ताफा बुलेवा देजौं वैलीद या रुंदशा रस्त्याकडे वळला. ताफ्याचा हा निर्णय पाहाताच पाठलाग करणाऱ्या स्कूटरचालकाला हवे ते उत्तर मिळाले. नजीकच्याच चौकात जाऊन त्याने स्कूटरचे धडाडते इंजिन जरा धीमे केले व जवळच्या एका उपाहारगृहाकडे मोर्चा वळवला. लगबगीने आत जाऊन त्याने खिशातून एक टोकन काढले आणि उपाहारगृहाच्या मागच्या बाजूला लावलेल्या टेलीफोनवरून एक स्थानिक कॉल लावला.

म्युदौं उपनगरातल्या एका छोट्याशा उपाहारगृहामध्ये बसून कर्नल बैस्तियाँ थिरी याच 'कॉल'ची प्रतीक्षा करत होता. पस्तीस वर्षीय कुटुंबवत्सल थिरी फ्रान्सच्या हवाईदलातल्या एअर मिनिस्ट्रीचा अधिकारी होता. परंतु वरवर दिसणाऱ्या त्याच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक प्रतिमेमागे एक वेगळीच व्यक्ती दडलेली होती. अध्यक्ष द गॉल यांच्याबद्दल मनात प्रचंड तिरस्कार भरलेली व्यक्ती!! १९५९ साली पुन्हा सत्तेवर निवडून आल्यावर अध्यक्ष द

गॉल यांनी अल्जेरियावरची फ्रान्सची सत्ता संपुष्टात आणून देश स्थानिकांच्या हवाली केला होता. बैस्तियाँ थिरीच्या तिरस्काराचे मूळ नेमके यातच होते. त्याच्या मते द गॉल यांनी त्यांना सत्तेवर आणणाऱ्या जनतेचा विश्वासघात तर केला होताच शिवाय प्राणपणाने अल्जेरियात लढलेल्या सैनिकांचे बलिदानही या निर्णयामुळे व्यर्थ गेले होते.

तसे पाहिले तर अल्जेरिया फ्रान्सच्या हातून गेल्यामुळे वैयक्तिकदृष्ट्या थिरीचे काही नुकसान झाले नव्हते; त्यामुळे त्याच्या तिरस्कारामागे काही वैयक्तिक कारण होते अशातला भाग नव्हता. परंतु तरीही द गॉल यांची हत्या हे थिरीचे मुख्य ध्येयच बनले होते. इतकेच नव्हे तर ते मोठे देशकार्यच ठरेल असे त्याचे मत होते. त्या काळात फ्रान्समध्ये इतरही बरेच नागरिक थिरीच्या या मताशी सहमत होते. परंतु द गॉल यांची हत्या करून सरकार पाडलेच पाहिजे अशी टोकाची भूमिका घेणाऱ्या 'सिक्रेट आर्मी ऑर्गनायझेशन'चे कट्टर सदस्य बनण्यापर्यंत फारजणांची मजल गेलेली नव्हती. अर्थात जहाल मतवादी थिरी या संघटनेचा घटक होता, हे वेगळे सांगायला नकोच. असो!

थिरी ज्या 'कॉल'ची इतक्या आतुरतेने वाट पाहात होता तो कॉल आला तेव्हा तो एका बारमधे बिअरचे घुटके घेत बसलेला होता. बारमनने फोन घेऊन थिरीकडे दिला व स्वत: टीव्हीचा आवाज कमी करण्याच्या निमित्ताने खोलीच्या दुसऱ्या टोकाकडे निघून गेला. फोनवरून दुसऱ्या बाजूच्या व्यक्तीने दिलेली माहिती ऐकताच थिरीने माउथपीसमध्ये ''अरे वा! उत्तम!'' असे पुटपुटून आपली पसंती दर्शवली व फोन ठेवला. बिअरच्या बिलाची व्यवस्था अगोदरच झालेली असल्यामुळे थिरीला त्याबद्दल चिंता करण्याचे कारण नव्हते. तो चटकन हॉटेलच्या बाहेर पडला. रस्त्याच्या कडेला उभे राहून त्याने काखेतले वर्तमानपत्र बाहेर काढले अन् काळजीपूर्वक त्याच्या घड्या दोनदा उलगडल्या.

थिरीचा हा 'इशारा' पाहाताच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूच्या एका घरात काही हालचाल झाली. पहिल्या मजल्यावरील त्या घरातल्या खिडकीपाशी एक स्त्री उभी होती. तिने इशारा मिळताच खिडकीचा झुळझुळीत पडदा बंद केला अन् मागे वळून म्हणाली, ''मार्ग क्रमांक २.'' त्या खोलीत बसलेल्या बारा व्यक्तींनी ही सूचना मनात नोंदवून घेतली. त्यांच्यापैकी पाचजण काहीसे नवशिके होते. हत्या, खून या प्रकारांना अगदी नवखे होते. अस्वस्थपणे हात चोळत बसलेल्या त्या पंचकडीत महिलेचे शब्द ऐकून एकदम चैतन्य आले

अन् ते पाचहीजण ताडकन उभे राहिले.

खोलीतले इतर सातजण वयाने थोडे मोठे होते अन् या 'खेळा'त फारसे नवखे नव्हते; त्यामुळे त्यांच्या मनात फारशी बेचैनी नव्हती. त्यांच्यापैकी वरिष्ठ होता लेफ्टनंट ऐलों तोकने. तो एक कट्टर उजवा मतवादी कार्यकर्ता होता आणि बैस्तियाँ थिरीचा उजवा हात मानला जात असे. ऐलों तोकने एका जमीनदार कुटुंबात जन्माला आला होता. पस्तीस वर्षांचा ॲलन विवाहित होता आणि त्याला दोन मुलेही होती.

परंतु त्या खोलीतली सर्वात खतरनाक व्यक्ती होती जॉर्जस् वट्टिन. मजबूत शरीरयष्टीचा चाळिशीच्या उंबरठ्यावरचा वट्टिन ओएएस (Organisation de l'armee secrete – OAS) या संघटनेचा कट्टर पुरस्कर्ता होता. तो मूळचा अल्जेरियाचा नागरिक होता अन् साठच्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात ओएएसचा अतिशय खतरनाक नेमबाज म्हणून ओळखला जाऊ लागला होता. बऱ्याच पूर्वी झालेल्या एका जखमेमुळे तो काहीसा लंगडत चालत असे; त्यामुळे त्याला लंगडा किंवा 'द लिंप' असे टोपणनाव पडले होते.

खोलीतल्या महिलेकडून द गॉल यांच्या ताफ्याची माहिती मिळताच उपस्थित बाराहीजणांनी ताबडतोब खाली रस्त्याकडे धाव घेतली आणि जवळच्याच एका गल्लीत उभ्या असलेल्या सहा मोटरसायकलींवर ते स्वार झाले. ही वाहने अर्थातच चोरीची तरी होती किंवा भाड्याची... वेळ होती सात वाजून पंचावन्न मिनिटे.

'हत्ये'च्या नियोजित स्थळासंबंधीच्या तयारीची सर्व सूत्रे खुद्द कर्नल बैस्तियाँ थिरीने स्वत:कडेच घेतली होती. हत्येकरता निश्चित केलेल्या तारखेच्या बरेच दिवस आधीपासून तो प्रत्येक बारकाव्यावर जातीने लक्ष ठेवून होता. बंदुकीच्या फैरी किती कोनातून झाडल्या जाव्यात, ताफ्यातल्या गाड्यांमधले अंतर व त्यांचा वेग किती असेल आणि गाड्यांना गोळीबाराद्वारे जागीच खिळवून ठेवण्याकरता किती दारूगोळ्याची गरज पडेल, या सगळ्या मुद्द्यांवर थिरीने अगदी बारकाईने विचार केलेला होता. द गॉल यांच्या हत्येकरता त्याने एक लांबच लांब सरळ रस्ता निवडला होता. त्या रस्त्याचे नाव होते 'आविनु दु ला लिबरास्यों.' हा रस्ता पुढे एका मुख्य चौकाला – पेटी-क्लमॉला मिळत असे. थिरीच्या योजनेनुसार द गॉल यांची गाडी चौकाच्या अलीकडे २०० यार्ड


अंतरावर असताना बंदूकधाऱ्यांच्या पहिल्या गटाने त्यांच्यावर गोळ्या झाडायच्या होत्या. गाडी योग्य जागी पोहोचेपर्यंत या नेमबाजांनी रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या एका ‘एस्टाफेट’ व्हॅनच्या मागे लपून राहायचे असे त्यांना सांगण्यात आले होते. अपेक्षित तो परिणाम साधण्याकरता चालत्या वाहनांवर कमीतकमी कोनातून गोळीबार केला जाणे आवश्यक होते. त्या दृष्टीने गाड्या योग्य जागी पोहोचताच गोळीबार सुरू करावा अशी आज्ञा नेमबाजांना दिली गेली होती.

◆



**नवी संहिता... नवा आशय...**

## अश्विन सांघी यांची २ नवीन पुस्तके





### दि रोझाबल लाइन

अनुवाद
**संकेत दि. लाड**

सर्व धर्मांच्या परस्पर संबंधांची नाळ उलगडत जाणारी अश्विन सांघी यांची अभ्यासपूर्ण कादंबरी

किंमत ५५०/-रु




### सियालकोट गाथा


अनुवाद
**तृप्ती कुलकर्णी**

फाळणीच्या दर्दभऱ्या अनुभवांमधून प्रवास करत नवं समाजभान निर्माण करणारी कादंबरी

किंमत ६००/-रु

**पोस्टेज अतिरिक्त। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# सापशिडी

## स्वाती चांदोरकर

*'जीवनाचे रंग हजार आणि सूक्ष्म मनोव्यापार... 'सापशिडी'तून घडतो कलात्मक आविष्कार*

## अपने धर्म पर चलो

**रि**टायर झालो आणि आता वेळच वेळ होता. इतका मोकळा वेळ की या वेळेचं करायचं काय? रिटायर्ड होण्यापूर्वी ठरवलं होतं की यंव करू त्यंव करू; पण म्हणजे नक्की काय? व्यायाम! पहाटे उठावं, गरम गरम चहा घ्यावा आणि मॉर्निंग वॉकला जावं. झकास व्हाइट टी-शर्ट, कॉलर असलेला, व्हाइट शॉर्ट्स, त्याला अर्धी चड्डी अथवा हाफ पॅन्ट असं म्हणायचं नाही. गावठी वाटतं. तर परिधान करायची. नाइकी अथवा आदिदासचे शूज घालायचे आणि ऐटीत बाहेर पडायचं. जेव्हा नोकरी करत होतो तेव्हा असे ऐटीत चालणारे बघितले होते. तेव्हा मनात विचार



करून ठेवला होता की आपणसुद्धा... फक्त रिटायर्ड होण्याची वाट बघत होतो.

रिटायर्ड झालो आणि पहिले पंधरा दिवस फक्त आराम करण्यात घालवले. पेपर वाचत बसायचं. खायचं, जेवायचं, वामकुक्षी घ्यायची, पुन्हा चहा-नाश्ता, मग टीव्ही आणि मग रात्रीचं भोजन की गुड नाइट; पण याला काही अर्थ नव्हता. जाम बोअर झालं पंधरा दिवसांतच. आता ठरवलं की ऐटीत मॉर्निंग वॉक सुरू करू. फर्मान काढलं...

''बायको, आपण दोघांनी रोज सकाळी वॉकला जायचं आहे उद्यापासून. मी असे असे कपडे घालणार आहे आणि तूसुद्धा...''

''मी?''

''अगं, म्हणजे मस्तपैकी .. त्या बायका व्यायाम करताना घालतात ना, तसे कपडे... हे बघ या app वर दाखवलं आहे... असे कपडे घेऊ तुझ्यासाठी. आजच जाऊ शॉपिंगला. हसत्येस काय?''

''तर काय?''

''का गं? म्हणजे तू काही फारशी जाड नाहीस; पण फिट राहण्यासाठी वॉक घ्यायचा. बारीक होण्यासाठी नाही.''

''साहेब, रिटायर्ड तुम्ही झाला आहात. मी नाही. आमची नोकरी अजून चालूच आहे. आणि या नोकरीत मेल्याशिवाय रिटायरमेन्ट नाही.''

''काय बोलत्येस?''

''खरं तेच सांगते आहे. मी जर बाहेर पडले तर सकाळचा गप्पूचा डबा कोण तयार करणार? त्याचा चहा, नाश्ता कोण करणार? तुम्ही जा. आम्ही बघतो आमचं.''

नाईलाज होता. मी निघालो. प्रथम सर्व सामानाची जुळवाजुळव केली. खरेदी करून आलो. छोटे नॅपकिन्ससुद्धा न विसरता खरेदी केले. घाम येणारच ना. दोन दिवस त्यातच गेले. तिसऱ्या दिवशी पहाटे जाग आली नाही. घरात चेष्टा सुरू झाली तसा चिडलो. मनातल्या मनात. मग मात्र ठरवलं, काहीही झालं तरी उद्या पहाटे बाहेर पडायचं आणि जायचं. दाखवून देईन सर्वांना. आदल्या रात्री आईला सांगितलं तशी तिने फक्त मान वळवली. आज चार वर्षं झाली, आई अंथरुणाला खिळून आहे. बायको, पोरगा सर्वकाही करतात तिचं. कुठे

चिडचिड नाही, राग नाही.

पहाटे गजर वाजला तशी जाग आली. जय्यत तयारी केली आणि बाहेर पडलो. हलकं उजाडत होतं. हवेत चांगला गारवा होता. मुंबई स्वच्छ भासत होती. प्रदूषण जाणवत नव्हतं. ही अशी मुंबई बघायची असेल तर याच वेळी बघावी. एकदा का दिवस सुरू झाला की हिचं चित्र पार बदलून जातं.

नाना-नानी पार्क! पार्कला लागून वॉकिंग ट्रॅक आहे. त्यावरून काही जण चालत होते. कुणी क्लॉकवाइज फेऱ्या मारत होते तर कुणी ॲन्टी क्लॉकवाइज. जे यंग होते ते पळत होते. इतक्या सकाळी पण इथे तशी बरीच गर्दी वाटत होती. प्रत्येकाची स्वत:ची चाल, स्वत:ची गती, वेग. मी माझी गती घेऊन त्यांच्यात सामील झालो. पंधरा ते वीस मिनिटं जेमतेम चाललो असेन आणि मला या प्रदक्षिणा घालायचा कंटाळा आला. विनाकारण हे गोल गोल काय फिरत बसायचं? मी काय भिंगरी आहे? एक बाक दिसला रिकामा तशी तिथे गेलो. दवाने ओला झाला होता तरी मारली बैठक.

दूरवर एक पोरगा काहीतरी विकत असताना दिसला. जसजसा तो जवळ येऊ लागला, त्याच्या हातातला पेपरांचा ढीग दिसला. तो अधिक जवळ आला.

''पेपर साहेब?''

''लोकमत आहे?''

''आहे ना.''

तितक्यात तो बाकासमोरून जाणाऱ्या माणसाशी कुठल्यातरी भाषेत बोलला. त्याने काहीतरी नाव घेतलं, तशी त्याने त्या गठ्ठ्यातून एक पेपर काढला, त्याची घडी करून त्याच्या हातात ठेवली. पुन्हा असंच झालं.

''तू कोणत्या भाषा बोलत होतास?''

''कानडी आणि मल्याळम.''

''तुला तो माणूस मल्याळी आहे हे कसं समजलं? आणि माझ्याशी तू सरळ मराठीत कसं बोललास?''

''चेहरा सांगतो ना साहेब.''

''या बागेत आत्ता कितीतरी लोक आहेत. तू त्यांचे चेहरे बघून ते कोणत्या जातीचे आहेत हे सांगू शकतोस?''

''हो, त्यात काय? ते पलीकडे आहेत ते गुजराती आहेत, त्यांच्या बरोबर

जे आहेत ते मारवाडी आहेत. आणि अगदी शेवटच्या बाकावर आहेत ते पारशी.''

''हे लोक इथे रोज येतात?''

''कुणी रोज येणारे आहेत, तर कुणी नवखे. जसे आज तुम्ही आलात, तसे.''

''मी मराठी आहे हेसुद्धा तुला माझ्या चेहऱ्याकडे बघून समजलं?''

''होय.''

''कसं रे?''

''लकब असते साहेब. प्रत्येक जातीची एक लकब असते. सरावाने जमतं. त्यात काही कठीण नाही.''

''हुशार आहेस.''

''धन्यवाद साहेब. येऊ का? अजून बराच गठ्ठा शिल्लक आहे.''

मी त्याला हो म्हणणार तितक्यात माझ्याच वयाचा एक माणूस माझ्या शेजारी येऊन बसला.

''तू कसो आसा?''

''बरा आसा.''

''खंचो पेपर दिऊ पासो?''

त्या दोघांचं बोलणं होत राहिलं. त्या पोराने पैसे घेतले आणि तो निघून गेला. शेजाऱ्याकडे बघून मी हसलो. तोही हसला.

''रोज घेता पेपर?''

''हो. ठरूनच गेलं आहे. दोन चकरा मारायच्या. इथे बसायचं. अथवा जिथे जागा असेल तिथे बसायचं. हा येतो शोधत शोधत.''

''हुशार आहे पोरगा.''

''अहो, याच्याबद्दलच काही दिवसांपूर्वी पेपरमध्ये छापून आलं होतं. याला खूप भाषा येतात आणि गंमत म्हणजे त्या त्याला सहजी येतात. न शिकता. तुम्ही जे काही बोलाल ते तो ऐकत राहतो, तुमच्या हावभावावरून कयास बांधतो. हळूहळू शब्द त्याच्या लक्षात राहतात आणि तो न घाबरता त्या व्यक्तीशी त्या व्यक्तीच्या भाषेत बोलायला सुरुवात करतो. चुकला तर ती व्यक्ती त्याला कौतुकाने दुरुस्त करते. एकपाठी आहे तो. गेले दीड वर्ष बघतो आहे त्याला.''

''कमाल. आणि इथे आपल्या मुलांना दुसरी भाषा शिकायची असेल तर लाखाने किंमत मोजावी लागते.''

''तुम्हाला आजच बघतो आहे. काय आहे की रोज रोज येऊन चेहरे ओळखीचे झालेले आहेत.''

''मी आजच आलो प्रथम. रिटायर झालो आहे काही दिवसांपूर्वी. काही दिवस घरातच होतो. म्हटलं, काही खरं नाही. निदान सकाळी तरी फिरून यायला हवं. निदान सकाळ तरी काही करण्यात जाईल. दिवसाचं गणित नंतर सोडवू.''

''उत्तम. मीही रिटायर्ड आहे; पण मी आधीच ठरवून ठेवलं होतं, रिटायर्ड लाइफ कसं घालवेन याचा अभ्यास केला होता. त्याप्रमाणे वागतो. टाइमटेबल बनवलं आहे चक्क. आणि ते मी नियमित पाळतो आहे. सी, मॅनेजमेंट इज मस्ट इन लाइफ.''

''खरं आहे.''

''ओ के. आता माझी ज्यूस प्यायची वेळ झालेली आहे.''

''ज्यूस?''

''बागेच्या टोकाला एक ज्यूसवाला आहे. सगळे आयुर्वेदिक ज्यूस असतात त्याच्याकडे. गुड फॉर हेल्थ. कारल्याचा, गव्हाच्या पात्यांचा, गाजराचा, दुधी भोपळ्याचा असे अनेक ज्यूस असतात त्याच्याकडे. चला, तुम्हाला दाखवतो.''

''चला... बाय द वे, आपलं नाव?''

''मला सगळे आबासाहेब म्हणतात. तुमचं नाव?''

''मला बाबासाहेब म्हणतात.''

''अरे वा, छान, उत्तम.''

तोंड कडू करून मी घरी आलो. कधी एकदा ती कारल्याची चव घालवतो असं झालं होतं. हा काय ज्यूस आहे?

''बायको, चहा टाक लगेच.''

''तयार आहे. अहो, जरा हळू... गरम आहे. काय झालं? इतकी भूक लागली आहे? बिस्कीट आणू?''

'नको. त्या आबासाहेबांनी जबरदस्तीने कारल्याचा ज्यूस प्यायला लावला. रक्त शुद्ध करा... असं म्हणाले. त्यांना कुणी सांगितलं की माझं रक्त अशुद्ध

आहे म्हणून? उगाच आपलं.''

''कोण आबासाहेब?''

''आहेत एक, बाकी मला काही माहीत नाही त्यांच्याबद्दल. रोज येतात बागेत वॉकला. मी त्यांना नाव विचारलं तर म्हणाले, आबासाहेब... मग मीही ठोकून दिलं... मला सगळे बाबासाहेब म्हणतात...''

''काहीतरीच काय?''

''मी गप्पूचा बाबा नाही? ऑफिसमध्ये मला सगळे साहेब नव्हते म्हणत? मग? हम भी कुछ कम नही। आणि हो, उद्या जाताना मला पन्नास रुपये दे. काय लाज वाटली आज. साधे पन्नास रुपये नसावेत खिशात?''

''पन्नास रुपयांचा ज्यूस घेतलात?''

''नाही गं, तो होता दहा रुपयांचा; पण त्यांच्याबरोबर अजून चार जण होते ना.''

''परवडणार नाही हं तुमचा हा मॉर्निंग वॉक. सांगून ठेवते.''

''काय परिस्थिती आली आहे! हा असाही दिवस दिसावा? नोकरी करत होतो तेव्हा हॉटेलात हजार हजार रुपयांचं बिल भरलं आहे मी. आणि आज केवळ पन्नास...''

''आई वाट बघत आहेत केव्हापासून. विचारत आहेत, बबन्या आला नाही का अजून? आणि पेपर? तो कशाला अजून? दोन दोन वर्तमानपत्रं येतात रोजची. तुम्ही तर साधी घडीही मोडत नाही आणि त्यात आता अजून एक.''

''दोन रुपयांसाठी रडू नकोस. मजाच झाली आज. एक पोरगा असतो तिथे पेपर विकत. तो ना कमालीचा हुशार आहे. माणसाच्या चेहऱ्याच्या ठेवणीवरून तो माणूस कुठल्या जातीचा आहे हे ओळखतो.''

''खरंच?''

''हो. आणि त्या माणसाला त्याच्या भाषेचं वर्तमानपत्र काढून देतो, त्याने न सांगता. कमाल आहे ना?''

''आहे कमाल. आता जरा तुम्ही पण कमाल करा. आई वाट बघत आहेत, तर त्यांना भेटा जाऊन. काय पण एक एक. तुम्हाला पण असंच त्याने ओळखलं आणि मराठी पेपर काढून दिला. लगेच तुम्ही त्याला दोन रुपये देऊन मोकळे झालात. म्हणजे ज्यूस आणि शिवाय हा पेपर. बारा रुपये रोजचे. कमीत कमी.''

“कर, तू हिशेबच करत राहा. जरा काही कौतुक म्हणून नाही. काही वेगळं सांगतो आहे, इंटरेस्ट घेऊन ऐकायचं तर ते नाही.”

“असा काटकसरीने संसार केला म्हणून हा ब्लॉक घेऊ शकलो, हे विसरू नका.”

“माहीत आहे. एक तो पोरगा, काहीही न शिकवता सर्व भाषा बोलतो, अस्खलित आणि इथे त्याचं काही कौतुक नाही.”

“मी काय करू सर्व भाषा शिकून? किंवा कौतुक करून? आई काय सांगायचा प्रयत्न करत आहेत हे त्या न बोलता मला समजतं, ही भाषा मला पुरेशी आहे. बघा, तुम्हाला ती तरी भाषा न शिकवता येते आहे का...”

“टोमणे बास झाले. जातो.”

बायको म्हणजे अगदी अरसिक. जरा पण प्रगल्भ व्हायला नको. बाबासाहेब, तुम्ही मोठमोठे शब्द वापरायला लागलात. होय, वापरावे लागतीलच. त्या आबासाहेबांची मिजास नको. काय? बरोबर ना?

“आई, काय झालं?”

“ऊं... ऊं... ऊऊ?”

“काय म्हणालीस?”

“ऊं ऊं ऊऊ?”

“बायको...”

“आले... काय झालं?

“आई काहीतरी विचारते आहे.”

“काय आई?”

“ऊं ऊं ऊऊ?”

“त्या विचारत आहेत की कुठे जाऊन आलात तुम्ही?”

“असं होय... बागेत गेलो होतो. वॉकला.”

“ऊउऊ?”

“आता काय म्हणाली?”

“त्या तुमच्या पोराला विचारा... त्याला येतात ना सर्व भाषा?”

“सांगतेस का?”

“विचारत आहेत की कशी आहे बाग?”

“छान आहे. नाना-नानी पार्क असं नाव आहे.”

''ऊं.''

''छान... असं म्हणाल्या.''

बाप रे, नाही जमत हिची भाषा आपल्याला. काय कमाल आहे. ज्या आईने मला अ आ शिकवलं तिची भाषा आज मला येत नाही. प्रगल्भ कोण आहे? मी, तो पोरगा की माझी बायको?

गप्पूला माझ्याशी बोलायला वेळ नाही. काल-परवापर्यंत मलाही वेळ नव्हता कुणाशी बोलायला. या मुंबईत घरातल्या लोकांशी बोलायला वेळ मिळतो कुठे? तरी गप्पूला सांगायला हवं. या वयात त्याचं पोट किती वाढलं आहे. एकाच जागी दिवसभर बसून राहायचं. कॉम्प्युटरमध्ये डोकं घालून बसायचं. या वयात इतकं मोठं पोट! लग्न तरी कोण करेल याच्याशी? ते काही नाही, त्याने रोज सकाळी माझ्या बरोबर फिरायला आलं पाहिजे. रात्री लोळत सिनेमा बघत राहायचं हे बंद व्हायला हवं.

''गप्पू, तू उद्यापासून माझ्या बरोबर वॉकला येणार आहेस. पहाटे उठवीन तुला.''

''बाबा, हा वॉक वगैरे वीस-पंचवीस दिवसांचं नाटक असतं. पुढे तुम्ही पण जाणार नाही, लिहून देतो. तुमचं नाटक आत्ताच सुरू झालं आहे... बघतो ना किती दिवस...''

बायको हसू लागली. आता माझा पारा चढणार, इतक्यात ती म्हणाली...


''गप्पू पण वॉकला जाऊ लागला तर आईंचं कोण करणार? मी तर जेवणात बिझी. तुम्ही वॉकला. त्यांचं आवरणार कोण? आणि तुम्हाला त्यांचं काही करायची सवयच नाही. गप्पू मनापासून करतो त्यांचं, हेच खूप आहे. आजकालची मुलं बघा. सरळ आश्रमात टाकून देतात म्हाताऱ्यांना. आणि त्यात जर त्यांना पॅरेलिसिस झाला असेल तर बघायलाच नको. आपला गप्पू तसा नाही. सर्वकाही करतो त्यांचं. घाण न वाटून घेता. असू दे. तुम्ही तुमचं चालू ठेवा चालणं. मला पण जरा सकाळची गडबड असते. तुम्ही घरात असलात की शंभर वेळा हाक मारत राहता आणि माझी कामं खोळंबतात.''

''मी घरी...''

''नको. जा तुम्ही. आम्ही आमचं नीट करतो आहोत सर्व. छान घडी बसली आहे.''

◆

**पुस्तकाच्या पानांतून**




# करवीर छत्रपती इंदुमती राणीसाहेब

**डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर**

*छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शिस्तबद्ध संस्कारात वाढलेल्या ... वाघालाही पाळीव प्राणी करणाऱ्या धाडसी झुंजार महाराणींची जीवनगाथा.*

कोल्हापूरच्या इतिहासात अनेक पराक्रमी, कर्तृत्ववान आणि उदार मनाच्या व्यक्ती होऊन गेल्या. ताराराणींनी राज्य स्थापन करताना सार्वभौमत्वाचा जो आग्रह धरला होता तो राज्य स्थापनेनंतर सतत शंभर वर्षे मोठ्या निकराने कायम ठेवला गेला. हे या राज्यांचे वैशिष्ट्यच मानावे लागेल. या शंभर वर्षांत संभाजी महाराज (करवीर) आणि शिवाजी महाराज (दुसरे) या दोघांच्याच कारकिर्दीचा समावेश आहे. एवढा प्रदीर्घ काल राज्यकारभार करण्याचे भाग्य फारच थोड्या महाराजांना लाभले असेल. या दोघांनीही प्रसंगी निजाम हैदरअली वगैरेंशी मैत्री केली आणि प्रसंगानुसार युद्ध आणि तहही केले; पण शेवटपर्यंत मोगलांचे किंवा इतर कोणाचे सार्वभौमत्व मान्य केले नाही. त्यांची



कारकीर्द प्रामुख्याने राज्याच्या संरक्षणाच्या प्रयत्नातच खर्ची पडली.

करवीर छत्रपतींना प्रथम पहिले शाहू, पेशवे, पटवर्धन व सावंतवाडीकर, भोसले आणि शेवटी इंग्रज यांच्याशी सतत झुंज द्यावी लागली. या सर्वांच्या त्रासातून बाहेर पडण्यासाठी यांची सर्व शक्ती खर्ची झाली. त्यामुळे त्यांचे लक्ष फारसे राज्यकारभाराकडे गेले नाही. भाऊबंदकीमुळे पेशव्यांचे सामर्थ्य कमी होऊ लागले तेव्हा दुसऱ्या शिवाजी महाराजांनी आपली कारकीर्द गाजवली. दुसऱ्या करवीर छत्रपतींनी पटवर्धन, इचलकरंजीकर, घोरपडे, सावंतवाडीकर, भोसले पोर्तुगीज व कर्नाटकच्या नबाबांच्या राजवटीवर चांगलाच वचक बसवला. १९व्या शतकाच्या उदयापूर्वीच भारतात नवे शास्त्र आणि शस्त्र हाती घेऊन इंग्रजांनी एकेक प्रदेश पादाक्रांत करण्यास सुरुवात केली, तेव्हा पश्चिमेकडील त्या वादळात टिपूपासून पेशव्यांपर्यंत सर्वच राज्ये कोलमडून पडली. त्यामुळे या सर्व धांदलीत कोल्हापूरचा निभाव लागणे शक्यच नव्हते. म्हणूनच इ. स. १८१२ नंतरच्या करवीर रियासतीचा भाग प्रामुख्याने इंग्रजांच्या साम्राज्याखाली एक संस्थान बनण्याच्या प्रक्रियेचा काळ म्हणावा लागेल. यात बुवासाहेब व चिमासाहेब यांनी इंग्रजांना जोरदार टक्कर देण्याचा प्रयत्न केला; परंतु तो प्रयत्न फोल ठरला. इंग्रजांच्या हुशारीपुढे कोणाचाच तेथे निभाव लागला नाही. नागपूरकर भोसले, होळकर, शिंदे, निजाम, भोपाळ, म्हैसूर आणि पेशवे यांच्याप्रमाणेच कोल्हापूरचेही स्वतंत्र राज्य नष्ट झाले.

कोल्हापूरच्या इतिहासात काही स्त्रियांनीही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मुळात हे राज्य महाराणी ताराबाईंनी औरंगजेबाला शह देण्यासाठी निर्माण केले होते. त्याचप्रमाणे ताराराणींची सवत राजसबाई, छत्रपती संभाजी महाराजांची राणी जिजाबाई, तसेच दुर्गाबाई, सईबाई ऊर्फ दिवाणसाहेब यांच्या कर्तृत्वाचा संदर्भही या कालखंडात उल्लेखला गेला व उजळून निघाला. कोल्हापूर राज्याला रामचंद्रपंत अमात्यांसारखे मुत्सद्दी पहिल्यापासूनच लाभल्यामुळे करवीर राज्य बरीच वर्षे सुरक्षित राहिले. रामचंद्रपंतांचा प्रदीर्घ अनुभव ताराराणींप्रमाणे संभाजी महाराजांनाही उपयोगी पडला. रामचंद्रपंतांप्रमाणेच यशवंतराव शिंदे, रत्नाकरपंत राजाज्ञा, हिंमतबहाद्दर प्रीतिराव चव्हाण, गुणाजीराव गायकवाड अशा अनेक सरदारांनी गाजविलेली तलवार कोल्हापूर राज्याची बांधणी पक्की करण्यास उपयुक्त ठरली. (करवीर रियासत - स. मा. गर्गे) त्यापैकी छत्रपती संभाजी महाराजांची कारकीर्द अत्यंत दुर्दैवी ठरली. छत्रपती संभाजी महाराजांची

हत्या झाली व त्यांच्या कारकिर्दीला इतिहासकारांनी न्याय न दिल्यामुळे ती अजूनच दुर्दैवी ठरली. छत्रपती शिवाजी महाराज वगळता छत्रपती शंभूराजांइतका शूर व तेजस्वी पुरुष अगोदर कधी झाला नव्हता व नंतरही कधी झाला नाही. छत्रपती शंभूराजांच्या कारकिर्दीची सुरुवातच मुळी कटकारस्थानांनी झाली. संभाजी महाराजांचा हक्क डावलून राजाराम महाराजांना गादीवर बसवण्याचा कट केला गेला. त्यानंतर शंभू महाराजांना विषप्रयोग करून ठार मारण्याचा घाट घातला गेला व त्यानंतर अकबराच्या साहाय्याने त्यांना पदावरून हटवण्याचे कारस्थान रचले. असे तीन कट त्यांच्या विरुद्ध झाल्याने संभाजी महाराजांचा स्वराज्यातील सर्व कारकुनांवरील विश्वास उडाला.

शंभूराजांनी कारस्थान करणाऱ्यांना भयंकर शिक्षा केल्या. खरंतर या शिक्षा पेशवेकाळातील शिक्षेपेक्षा खूपच सौम्य होत्या. त्या राजनीतीत बसणाऱ्याच होत्या; परंतु इतिहासकारांना त्याचे खूपच दुःख झाले. औरंगजेबाच्या आक्रमक फौजांपासून आपल्या राज्याचे संरक्षण करण्यात महाराजांची आठ-नऊ वर्षे गेली. महाराजांची हत्या झाली, तेव्हा शत्रूकडून हालहाल होत असतानाही तोंडातून शरणागतीचा एक शब्दही न उच्चारण्यात त्यांचा खरा मोठेपणा होता. छत्रपती संभाजी महाराजांची हत्या ही मराठ्यांच्या इतिहासाला काळिमा फासणारी मोठी दुःखद घटना होती. या घटनेमुळे मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धावर दूरगामी परिणाम झाला. आपल्या लाडक्या छत्रपतींच्या म्हणजेच शंभूराजांच्या निर्घृण हत्येमुळे सर्व मराठी समाज सुडाने पेटून उठला. अशा चिडलेल्या, गरम रक्ताच्या मराठ्याला चिरडून टाकणे, औरंगजेबाला अजिबात शक्य होणार नव्हते.

छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीप्रमाणेच छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीची सुरुवातही संकटांच्या मालिकांनी भरली होती. फरक एवढाच होता की, छत्रपती संभाजी महाराजांवरील संकटे स्वकीयांनी आणली होती, तर राजाराम महाराजांवरील संकटे शत्रूने आणली होती. छत्रपतींच्या हत्येने सर्व मराठा लोकांना जबरदस्त धक्का बसला. सर्व मराठे नाराज होते. या सर्व गोंधळात स्वराज्यात चहूबाजूंनी शत्रूने आपले हातपाय पसरण्यास सुरुवात केली होती. स्वराज्यातील गड व किल्ले भराभर शत्रूच्या हाती पडू लागले. वतनदार सरदार मंडळी गुपचूप मोगलांना जाऊन मिळू लागली. राजधानीला वेढा पडला होता. येसूबाई राणीसाहेब, छत्रपती राजाराम महाराज, छत्रपती

शाहू महाराज यांच्या जीविताची शाश्वती नव्हती. आपला जीव वाचवण्यासाठी राजाराम महाराजांना महाराष्ट्रातून कर्नाटकाकडे पळ काढावा लागला. इकडे महाराष्ट्रात रायगडाचा पाडाव होऊन येसूबाई राणीसाहेब व शाहूराजे मोगलांचे कैदी बनले; परंतु लवकरच मराठे या सर्व वाईट परिस्थितीतून सावरले. नाशिकपासून अर्कोटपर्यंत संताजी-धनाजींच्या नेतृत्वाखाली फौजा फिरू लागल्या. राजाराम महाराजांनी गनिमी काव्याने शत्रूस हैराण केले. शत्रूमध्ये दहशत निर्माण केली. गडकोट व आपले प्रदेश सोडवले. स्वराज्याचा कारभार थाटला. राजाराम महाराज संभाजी महाराजांसारखे शूर नव्हते, तरीही आपल्या मृदू व गोड स्वभावामुळे त्यांनी हाताखालच्या माणसांत आपल्याविषयी प्रेम व आदरभाव निर्माण केला. राजाराम महाराजांनी आपल्या सेनेकडून शौर्याची कामे करवून घेऊन सर्व पोकळी भरून काढली. स्वराज्य संपूर्ण लयाला गेले होते. तरी राजाराम महाराजांनी शत्रूशी संघर्ष सुरू ठेवून स्वराज्याची कल्पना जागृत ठेवली.

राजाराम महाराजांनी आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीसच रणनीतीने व राजनीतीने आपल्या शत्रूला जबरदस्त शह दिला. स्वराज्याची भूमी विजयी मोगल सैन्यांनी व्यापली असता महाराष्ट्रातून गुप्तपणे दूर जिंजीकडे कर्नाटकात निसटून त्यांनी तेथे राजधानी स्थापन केली आणि त्यामुळे कर्नाटकात दुसरी राजकीय आघाडी उभारली गेली. बादशहाला मोठ्या प्रमाणावर आपले लष्कर कर्नाटकात पाठवावे लागले. याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रात स्वराज्यावर आलेला मोगली आक्रमणाचा दबाव एकदम कमी झाला. शत्रूचे चित्त द्विधा करण्यात मराठे यशस्वी झाले. इतकेच नव्हे तर त्यांच्या फौजांना नाशिक ते तंजावर असे नवे विस्तीर्ण रणमैदान धावपळीच्या व गनिमी काव्याच्या लढ्यासाठी खुले झाले.

हा जसा मराठ्यांनी मोगलांना दिलेला रणनीतीचा शह होता, तसा तो राजकीय शहही होता. राजाराम महाराज जर महाराष्ट्रात राहिले असते, तर ते शत्रूकडून पकडले जाण्याची फार मोठी शक्यता होती आणि तसे झाले असते तर रायगड पडल्यानंतर मराठ्यांचे आख्खे राजकुटुंबच औरंगजेबाच्या हाती पडून हिंदवी स्वराज्याचा डोलारा कोसळला असता.

राजाराम महाराज कर्नाटकात गेल्यानंतर रायगड शत्रूने जिंकून घेऊन सर्व राजपरिवारास कैदी बनवले. त्यामुळे सर्वत्र निराशेचा अंधकार पसरला. हिंदवी

स्वराज्य बुडल्यातच जमा झाले. अशा अत्यंत वाईट परिस्थितीतून मराठे बाहेर पडले व त्यांनी अवघ्या सहा महिन्यांतच गेलेले गड-किल्ले ताब्यात घेण्यास सुरुवात केली. राजाराम महाराजांबरोबर संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनाही विजयाचे श्रेय द्यावे लागेल. मुत्सद्देगिरीमुळे राजाराम महाराजांनी यश खेचून आणले.

छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर मराठी राज्याची धुरा सांभाळण्याची जबाबदारी महाराणी ताराराणींवर येऊन पडली. या वेळी औरंगजेबाने जीव तोडून मोहिमा हाती घेतल्या. स्वराज्यात सर्वत्र धुमश्चक्री चालू होती. काबूलपासून बंगालपर्यंत व काश्मीरपासून कावेरीपर्यंत पसरलेल्या अफाट प्रदेशाच्या सम्राटाशी महाराष्ट्रातील पंचवीस वर्षांची एक तरुण विधवा राणी संघर्ष करावयास उभी राहते, हेच स्वातंत्र्ययुद्धाच्या शेवटच्या पर्वाचे वैशिष्ट्य आहे. मराठी राज्य संपले असे वाटेपर्यंत मोगल-मराठा संघर्ष अधिकच तीव्र बनला आणि त्यांनी खुद्द औरंगजेबास संपवले.

मोगल-मराठा संघर्षात संभाजी महाराज, राजाराम महाराज व महाराणी ताराराणी अशा तीन राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली मराठे लढले, म्हणजे मराठ्यांच्या बाजूने दोन वेळा नेतृत्वात बदल झाला. याउलट मोगलांच्या बाजूने कोणताही बदल झाला नाही. औरंगजेब स्वत: सेनेचे नेतृत्व करत पुढे होऊन लढत होता. प्रदीर्घ लढाई लढण्यासाठी औरंगजेब अतिशय कष्टमय जीवन जगत होता. जिद्द, चिकाटी, शौर्य औरंगजेबाच्या रोमारोमांत भरले होते. ज्या चिकाटीने औरंगजेब लढत होता, त्याच्या दहा पट जिद्दीने, चिकाटीने मराठे लढत होते. मोगलही अत्यंत चिवट आणि पराक्रमी होते. औरंगजेबासारखा शूर नेता त्यांना लाभला होता. म्हणूनच तर ते तग धरून दक्षिणेत उभे ठाकले होते.

◆

## १६ जून ते १५ जुलै २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० जून दरम्यान खास सवलत**

**१६ जून - डॉ. नंदकुमार उकडगावकर यांचा जन्मदिन**

'हेल मेट्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२६/-**

---

**१८ जून - जागतिक पितृदिन**

'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - २', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स भाग २','चिकन सूप फॉर द फादर अॅन्ड सन सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर अॅन्ड सन सोल, भाग - २','चीपर बाय दी डझन', 'वपु', 'वपु सांगे वडिलांची कीर्ती', 'पितृऋण' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७३५/- । सवलत किंमत १०८८/-**

---

**१७ जून - संत कबीर यांचा जन्मदिन**

'भक्तीत भिजला कबीर', 'म्हणे कबीर दिवाणा', 'मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही!', 'साद घालतो कबीर', 'ऐका संतांनो', 'प्रेमरस... कबीरांचा!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०६५/- । सवलत किंमत ६७९/-**

---

**१७ जून - प्रा. शशिकांत कुगांवकर यांचा जन्मदिन**

'नभांतमणी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २९४/-**

---

**१९ जून - बेबी हालदार यांचा जन्मदिन**

'आलो-आंधारि' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**२० जून - रॉबर्ट क्रेस यांचा जन्मदिन**

'द वॉचमन', 'द वॉन्टेड' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७१०/- । सवलत किंमत ४२४/-**

**२१ जून - ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स यांचा जन्मदिन**

'शांताराम', या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ९९५/- । सवलत किंमत ६९७/-**

**२१ जून - स्वाती चांदोरकर यांचा जन्मदिन**

'अनाहत', 'आणि विक्रमादित्य हरला!', 'सेलिब्रेशन', 'एक पायरी वर', 'फॉरवर्ड अँड डिलिट', 'गोल गोल राणी', 'हिज डे', 'काळाकभिन्न', 'पवित्रम्', 'शेष', 'उत्खनन', 'वपु', 'युथनेशिया', 'तोड', 'सापशिडी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २९५०/- । सवलत किंमत १६८८/-**

**२१ जून - बहार दत्त यांचा जन्मदिन**

'हरित युद्धे', या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

**२१ जून - जागतिक संगीत दिन**

'मायकल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी!', 'मंद्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२६५/- । सवलत किंमत ७१९/-**

**२१ जून - जागतिक योगा दिन**

**संच १** - 'आपण आपले ताणतणाव - एक चिंतन', 'आरोग्यासाठी योग', 'पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'ची रनिंग', 'ध्यानसूत्र', ''स' सुखाचा!', 'चिंता सोडा सुखाने जगा', 'पाणी : एक अद्भुत उपचारपद्धती', 'धन्वंतरी घरोघरी', 'चला जाणून घेऊ या! चालणे', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०४०/- । सवलत किंमत १२५७/-**

**संच २ -** 'निरामय यशासाठी ध्यान', 'द माइंड जिम', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'स्थूलतेला करा टाटा', 'स्वतःचा शोध', 'अर्थाच्या शोधात', 'मनावर विजय', 'एकच पेला शिवाम्बूचा', 'चला जाणून घेऊ या! तंदुरुस्ती', 'चला जाणून घेऊ या! आयुर्वेदाद्वारे आहार आणि आरोग्य', 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग' या

पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८९०/- । सवलत किंमत १२१३/-**

**संच ३ -** 'चिंतामुक्त जीवन', 'कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना', 'सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा', 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'हसत-खेळत ध्यानधारणा', 'प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स', 'सुंदर मन', 'अन्नपुराण– आयुर्वेदिक, आधुनिक', 'लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स', 'चला जाणून घेऊ या! योगविद्या', 'सौंदर्य आणि तारुण्य टिकविण्यासाठी योगसाधना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १९०५/- । सवलत किंमत १२५३/-**

---

**२२ जून - डॅन ब्राऊन यांचा जन्मदिन**

'एन्जल्स अ‍ॅण्ड डेमन्स', 'डिसेप्शन पॉईंट', 'डिजिटल फॉर्ट्रेस', 'द दा विंची कोड', 'द लॉस्ट सिम्बॉल', 'इन्फर्नो', 'ओरिजिन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३८५०/- । सवलत किंमत २३३२/-**

---

**२२ जून - महादेव मोरे यांचा जन्मदिन**

'चेहऱ्यामागचे चेहरे', 'इगिन', 'चिताक', 'एकोणिसावी जात', 'माणसं – अशीही', 'मत्तीर', 'झोंबडं', 'पाव्हणा', 'बळी', 'तुझी कथा माझे शब्द', 'गब्रू', 'रैत' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २४३५/- । सवलत किंमत १४८५/-**

---

**२२ जून - विकास स्वरूप यांचा जन्मदिन**

'सहा संशयित', 'स्लमडॉग मिलेनिअर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७४५/- । सवलत किंमत ५२२/-**

---

**२४ जून - बाबू गंजेवार यांचा जन्मदिन**

'चाणाक्ष' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-**

---

**२५ जून - सुधा रिसबूड यांचा जन्मदिन**

'अंतरिक्षाचा वेध', 'गार्डिअन', 'कल्पित-अकल्पित', 'रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ५०५/-**

**२५ जून - शशी पाटील यांचा जन्मदिन**

'एकच पेला शिवाम्बूचा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

**२५ जून - जोना लेहरर यांचा जन्मदिन**

'प्रतिभेचा इंद्रधनू' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

**२६ जून - छत्रपती शाहू महाराज जयंती**

'छत्रपती राजर्षी शाहू महाराज', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास', 'समाज क्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८३५/- । सवलत किंमत ११९१/-**

**२६ जून - पर्ल एस. बक यांचा जन्मदिन**

'काळी', 'पिढी दर पिढी', 'द मदर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०२०/- । सवलत किंमत ७०४/-**

**२७ जून - राम प्रधान यांचा जन्मदिन**

'पहिली फेरी?(१९६५ भारत-पाक युद्ध)', 'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध', 'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ६४९/-**

**२७ जून - ई. आर. ब्रेथवेट यांचा जन्मदिन**

'टू सर, विथ लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

**३० जून - दिनकर जोषी यांचा जन्मदिन**

'अ-मृत पंथाचा यात्री', 'अंकरहित शून्याची बेरीज', 'अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम', 'कालपुरुष', 'महाभारतातील मातृवंदना', 'महाभारतातील पितृवंदना', 'सुरमयी सूर्यास्त', 'रामायणातील पात्रवंदना', 'इथे कुणी नाही', 'महामानव

सरदार पटेल', 'कृष्णं वन्दे जगद्गुरुम्', 'परतुनि ये घनश्याम', 'अमृतयात्रा', 'द्वारकेचा सूर्यास्त', 'भारतीय संस्कृतीचे सर्जक', 'प्रश्नप्रदेशापलीकडे', 'प्रकाशाची सावली', 'प्रतिनायक', 'चक्र ते चरखा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४७००/- । सवलत किंमत २९३८/-**

**३० जून - करण बजाज यांचा जन्मदिन**

'कीप ऑफ द ग्रास' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १ ते १५ जुलै दरम्यान खास सवलत**

**१ जुलै - जागतिक विनोद दिन**

'कसं बोललात! भाग १ ते ७', 'हसाल तर वाचाल', 'फुकट', 'खुमासदार अत्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०९५/- । सवलत किंमत ६३४/-**

**१ जुलै - मीना कर्णिक यांचा जन्मदिन**

**'अरुणाची गोष्ट', 'स्वर्गकन्या' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत**
**संचाची मूळ किंमत ६००/- । सवलत किंमत ३६३/-**

**१ जुलै - इव्हा हॉफमन यांचा जन्मदिन**

'कालाय नमः' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ११२/-**

**२ जुलै - जागतिक UFO दिन**

'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!', 'अंतराळवीर सुनीता विल्यम्स', 'स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५८०/- । सवलत किंमत ३९३/-**

**२ जुलै - पीटर कुझनिक यांचा जन्मदिन**

'अमेरिकेचा न सांगितला गेलेला संक्षिप्त इतिहास' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४७/-**

**४ जुलै - योगिनी वेंगुर्लेकर यांचा जन्मदिन**

‘शत्रूशी दोन हात’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २४९/-**

---

**४ जुलै - नेथानिएल हॉथॉर्न यांचा जन्मदिन**

‘प्रायश्चित्त’, ‘शापित वास्तू’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५३०/- । सवलत किंमत ३७१/-**

---

**४ जुलै - डॉ. अरविंद कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ११२/-**

---

**४ जुलै - व्हेरा गिसिंग यांचा जन्मदिन**

‘आठवणींचे मोती’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १६८/-**

---

**४ जुलै - नीरज कुमार यांचा जन्मदिन**

‘खाकी फाइल्स’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

---

**४ जुलै - जीन सॅसन यांचा जन्मदिन**

‘ग्रोईंग अप बिन लादेन’, ‘मयादा - इराकची कन्या’, ‘युवराज्ञी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८७०/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**५ जुलै - वीर संघवी यांचा जन्मदिन**

‘नवभारताचे शिल्पकार’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ९८/-**

---

**६ जुलै - रेखा बैजल यांचा जन्मदिन**

‘अज्ञेय’, ‘प्रस्थान’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-**

**७ जुलै - परमपूज्य दलाई लामा यांचा जन्मदिन**

‘करुणेचे बीज’, ‘परमसुखाची पर्वणी’, ‘धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ५०१/-**

---

**१० जुलै - स्मिता भागवत यांचा जन्मदिन**

‘प्रतिनायक’, ‘प्रकाशाची सावली’, ‘परतुनि ये घनश्याम...’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १३२०/- । सवलत किंमत ९२४/-**

---

**१० जुलै - ख्रिस टर्नी यांचा जन्मदिन**

‘१९१२ अंटार्टिकाच्या शोधात’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१५/-**

---

**११ जुलै - रिमल चंगेडे यांचा जन्मदिन**

‘आजचा मेनू’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १४६/-**

---

**११ जुलै - झुंपा लाहिरी यांचा जन्मदिन**

‘द नेमसेक’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**११ जुलै - जेन गार्डम यांचा जन्मदिन**

‘द मॅन इन द वुडन हॅट’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २०९/-**

---

**१२ जुलै - जागतिक मलाला दिन**

‘मी मलाला’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १४९/-**

---

**१२ जुलै - मनोहर माळगांवकर यांचा जन्मदिन**

‘इथे थबकली गंगामाई’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१५/-**

**१३ जुलै - माधुरी शानभाग यांचा जन्मदिन**

'ॲज आय सी... स्त्रियांचे सक्षमीकरण...', 'ॲज आय सी... भारतीय पोलीस सेवा...', 'ॲज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन', 'कीप ऑफ द ग्रास', 'स्मार्ट लिडरशीप' 'जेआरडी : एक चतुरस्त्र माणूस', 'द जॉय ऑफ कॅनस्त्र', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १३५५/- । सवलत किंमत ८०८/-**

---

**१३ जुलै - बाजीप्रभू बलिदान दिन**

'पावनखिंड', 'श्रीमानयोगी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५७८/-**

---

**१४ जुलै - सुषमा शाळीग्राम यांचा जन्मदिन**

'अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम', 'कालपुरुष', 'महाभारतातील मातृवंदना', 'महाभारतातील पितृवंदना', 'चला जाणून घेऊया गुढगेदुखी', 'अतरापी', 'तिमीरपंथी', 'कर्णलोक', 'महामानव सरदार पटेल', 'कृष्णं वन्दे जगद्‌गुरुम्', 'चक्र ते चरखा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २२७०/- । सवलत किंमत १५८९/-**

---

**१५ जुलै - अनंतराव खरात यांचा जन्मदिन**

'शर्यती-स्पर्धा-खेळ' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---


**१५ जुलै - विजय देवधर यांचा जन्मदिन**

'फ्रॉम रशिया विथ् लव्ह', 'नो कम बॅक्स', 'द सेव्हन्थ सिक्रेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९९०/- । सवलत किंमत ६९३/-**

◆










महाकादंबरीकार
विश्वास पाटील
लिखित 'महासम्राट'
या छत्रपती शिवरायांवरील चरित्रमालेतील दुसरा खंड
'रणखैंदळ'चे प्रकाशन. पुस्तकाला पहिल्याच आठवड्यात
जसा उदंड प्रतिसाद लाभला त्याचप्रकारे वाचकांची उपस्थितीही लक्षणीय होती.




'राझमहाल' या पुस्तकाचे लेखक नील नेथन व अनुवादक गौरी देशपांडे यांनी पुस्तक निर्मिती मागची गोष्ट उलगडताना अनेक रहस्यांना कथेत कसे गुंफले व लेखनाचा प्रवास कसा झाला यावर संवाद साधला. यावेळेस वाचकांना पुस्तकावर स्वाक्षरी घेण्याची व लेखकाशी संवाद साधण्याची संधीही मिळाली.












**'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023**

**RNI. No. MAHMAR/2000/02739**

Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.

Publication Date : 11/06/2023 Posting Date : 11/06/2023

## आवर्जून वाचावे...




























**मेहता मराठी ग्रंथजगत**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,